म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९२९



# …स्लामचे
# …रतीय चित्र

REFBK-0023533

## हमीद दलवाई

मराठीं ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 JUL 1982

25 JUL 1982

21 MAR 1984

12 NOV 1988

(क्रु. मा. प.)
५०००-४-८०

इस्ल

# इस्लामचे भारतीय चित्र

हमीद दलवाई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 23533
शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023533

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
३ मे १९८२

हमीद दलवाई : पाचवी पुण्यतिथी

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

मूल्य : दहा रुपये

मुद्रक :
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार, पुणे ३०

संदर्भ निबंध
२८२९
23433
23|5|82

मुस्लिमांचे भारतीय लोकजीवनाशी
सेक्युलर इंटिग्रेशन
व्हावे
यासाठी झुंजणाऱ्या सर्व ज्ञात व अज्ञात
कार्यकर्त्यांना
समर्पण.

# प्रास्ताविक

३ मे १९८२ ही हमीद दलवाईंची पाचवी पुण्यतिथी. त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या दहा लेखांचा हा संग्रह प्रकाशित होत आहे. हमीद दलवाईंचे सर्वच स्फुट लेखन अशा रीतीने ग्रंथबद्ध होणे युक्त ठरेल. एका संवेदनाशील मनाची ही स्पंदने आहेत. त्यांचे वाचन – चिंतन – चर्चा होणे लाभदायक ठरेल.

'मराठा' दैनिकात १९६८ साली त्यांचे हे लेख क्रमाने प्रसिद्ध झाले. हमीद दलवाईंच्या वैचारिक घडणीचा तो काल होता; आणि त्या दृष्टीने या लेखांना एक विशिष्ट असे महत्त्व आहे. हमीद दलवाई, अ. भि. शहा आणि नरहर कुरुंदकर हे तिघे भारताचे सेक्युलर इंटिग्रेशन व्हावे, यासाठी तळमळत.
श्री. हमीद दलवाई कोकणातील मुस्लिम समाजात जन्मले आणि वाढले. राष्ट्र सेवा दल व समाजवादी चळवळीशी त्यांचा घनिष्ठ संबंध असला तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्र होते. श्री. अ. भि. शहा हे विचारांच्या बैठकीच्या दृष्टीने मानवेंद्रनाथ रॉय यांच्या पठडीतले. सखोल आणि व्यापक व्यासंगाची त्यांना सवय होती. एक निर्भय आणि विधायक विचारवंत ते होते. ह्या प्रश्नाचा त्यांनी अनेक अंगांनी विचार केला होता.

निझामच्या राज्यात नरहर कुरुंदकरांचा जन्म झाला. स्वामी रामानंद-तीर्थांच्या परिवारात त्यांची जडणघडण झाली. त्यांचाही व्यासंग मोठा होता; आणि विचार स्पष्ट होते. त्यांची मांडणी विलक्षण मनोहारी असे. सेक्युलर इंटिग्रेशनच्या आघाडीवरचे हे तीन बिनीचे लढवैये. पाचच वर्षांत त्या सर्वांना आपण पारखे झालो याची खंत वाटते, पण त्यांनी पेरलेली बीजे शक्तिशाली आहेत. दुर्भेद्य वाटणारे खडक फोडून त्यांचे कोंब लवलवत वर येऊन आकाशाशी गुज केल्यावाचून राहाणार नाहीत.

2226
वा. क्र. 23533
निबंध 23/5/82
(स्थळ प्रत)

# एक अस्सल भारतीय

**वसंत नगरकर**

गेली चाळीस वर्षे मी या ना त्या भूमिकेत सार्वजनिक जीवनात वावरत आहे. या काळात असंख्य व्यक्तींशी माझा परिचय झाला. बरेच मित्र झाले. पण ज्याला निखालस भारतीय म्हणता येईल अशा किती व्यक्ती भेटल्या याचा आढावा घेतला तर त्यांची संख्या हातांच्या बोटांवर मोजण्याइतकीच भरेल ! त्यात बराच वरचा नंबर हमीद दलवाईंचा होता. घराण्याची प्रतिष्ठा, श्रीमंती, उच्च शिक्षण यांसारखे कोणतेही भांडवल त्यांच्याजवळ नव्हते, उलट दारिद्र्याशी झगडा करून स्वतःच्या व वडलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी अविश्रांत धडपड आणि खडतर जीवन जगत असतानाही त्याच्या-सारख्या उतावळ्या व अधूनमधून जगाचा राग घरात काढीत असलेल्या नवऱ्यावर नितांत प्रेम करणारी व त्याच्यासाठी आपल्या माहेरच्या श्रीमंतीकडे पाठ फिरविलेली पत्नी एवढीच हमीदची पुंजी होती ! पण त्याचे वैभव काही आगळेच होते. मराठी भाषेवर असामान्य प्रभुत्व, अत्याधुनिक विचारसरणी आणि तिचा पाठपुरावा करून आपल्या समाजाला व देशाला सुधारण्याची आत्यंतिक तळमळ व त्यासाठी वाटेल तेवढे कष्ट, मानहानी, विरोध सहन करण्याची ताकद त्याच्यात होती.

सी. आय्. डी. मध्ये असताना हमीदचे नाव मी ऐकत होतो, पण ते फक्त वर्तमानपत्रांतूनच. त्याची प्रागतिक मते मला आवडत, पण भेटीचा योग आला नव्हता. त्याच्या प्रस्तुत लेखसंग्रहातील पहिले काही लेख प्रसिद्ध झाले तेव्हा मी त्याला पाहिलेही नव्हते. एक दिवस ऑफिसमध्ये त्याच्या परि-

सरातील व नात्यातील मुसलमानांचे एक शिष्टमंडळ माझ्या भेटीसाठी आले. ' हमीद मुस्लिम स्त्रियांच्या मुक्तीची किंवा मुसलमानांना द्विभार्याप्रतिबंधक कायदा लागू करावा अशी भाषा करतो, पण तो एक नंबरचा भोंदू आहे; तो स्त्रीलंपट आहे. त्याने स्वतःच दुसरे लग्न केले असावे, अशी आमची खात्री आहे. त्याच्यामुळे आमच्या दलवाई घराण्याचे नाव बद्दू होत आहे. तेव्हा त्याचा काही तरी बंदोबस्त करा ' ही या शिष्टमंडळाची हमीदविरुद्ध तक्रार होती ! ही मंडळी माझ्याकडे का आली, याचा मला उलगडा होईना. त्यांचे म्हणणे खरे असते तरीही या लोकशाही देशात माझ्यासारखा सरकारी नोकर हमीदचा काय ' बंदोबस्त ' करू शकणार, ही माझ्या मनातली शंका त्यांच्या दृष्टीने निरर्थक होती. ' साहेब, तुम्ही मनात आणले तर सर्व काही करू शकाल ! ' असे ती मंडळी मला पुनःपुन्हा बजावीत होती. ती मंडळी गेल्यावर आता हमीदशी ओळख करून घेतलीच पाहिजे, असे माझ्या मनाने घेतले. त्याच्याविरुद्धचे आरोप दुष्टबुद्धीने खोटेनाटे उभे करून रंगवण्यात आले होते, हा निष्कर्ष काढण्यासाठी चौकशीची आवश्यकता नव्हती. कारण त्याच्या पहिल्या ज्या कादंबरीबद्दल, या मंडळींनी सुरुवातीलाच मोठे काहूर व आकांडतांडव केले होते ती ' इंधन ' कादंबरी मी वाचली होती व मला आवडली होती. मराठा दैनिकातल्या अत्र्यांच्या अग्रलेखांइतकेच हमीदच्या लेखांबाबत मला आकर्षण वाटत असे.

सुदैवाने माझे मित्र प्रा. शंकर व प्रा. सरोजिनी वैद्य यांच्याकडे थोड्या दिवसांत हमीदची आणि माझी यदृच्छेने गाठ पडली. पहिल्या भेटीतच आम्ही एकमेकांच्या खूप जवळ आलो. त्याच्या मृत्यूनंतर त्याने मला धाडलेल्या पत्रांतले अनेक उतारे ' साधना 'त प्रसिद्ध झाले, पण पुस्तकरूपाने ती पत्रे अद्याप प्रसिद्ध होऊ शकली नाहीत ! आमच्या पहिल्या भेटीनंतर हमीदच्या अकाली निधनापर्यंत म्हणजे जवळजवळ नऊ वर्षे आम्ही जीवश्चकंठश्च मित्र झालो होतो.

या छोट्या संग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचा अधिकार ज्यांचा होता ते माझे

मित्र व हमीदचे सहकारी प्रा. अ. भि. शहा, तेही दुर्दैवाने काही महिन्यांपूर्वीच कालवश झाले. त्यामुळे अधिकार नसताही मी ही प्रस्तावना लिहिण्याचे मान्य केले.

श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या प्रोत्साहनाने व कोरगावकर ट्रस्टच्या दातृत्वामुळे हमीदला वर्षभर सुटी घेऊन भारतदर्शन करण्याची किंवा निरनिराळ्या भागांतल्या मुस्लिम जनतेची जवळून ओळख करून घेण्याची संधी मिळाली. देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे नेतृत्व स्वीकारण्याअगोदर महात्मा गांधींनी एक वर्ष देशाच्या कानाकोपऱ्यांत हिंडून, निरनिराळ्या लोकांना भेटून नंतरच प्रत्यक्ष कार्याला आरंभ केला, तशासारखीच काहीशी हमीदची ही पूर्वतयारी होती. दुर्दैवाने या संग्रहात हमीदच्या सर्व भागातल्या दौऱ्यांचा समावेश करता आला नाही. त्याच्या हातून जेवढे लिहून झाले होते तेवढेच यासंबंधी आता उपलब्ध आहे. पहिला लेख तर या दौऱ्याअगोदरचाच आहे. हमीदची मते, जीवनमार्ग सुस्पष्ट होण्यापूर्वीचे हे सर्व लिखाण आहे. पण त्यातही त्याचा आधुनिक दृष्टिकोण, त्याची तळमळ, धडपड, ईर्ष्या इत्यादी सर्वांचे दर्शन होते.

फाळणीपूर्वकालात आणि विशेषतः १९२५ ते १९४७ पर्यंतच्या वीस-बावीस वर्षांत मुस्लिम जातीयवादी नेतृत्वाने प्रचाराचा पाऊस पाडून आपली जमात एकसंध असल्याचा आभास निर्माण केला होता, परंतु हा दावा किती पोकळ होता ते या संग्रहातल्या अनेक लेखांवरून दिसून येईल. गावातील हिंदू देवाला समारंभपूर्वक नारळ अर्पण करून मुस्लिम लीगची स्थापना करणारे नेते, सामाजिक समतेचा डंका वाजवून स्वधर्माची फुशारकी मारणारे, पण प्रत्यक्षात स्वातंत्र्यानंतर हिंदू पाणी, मुस्लिम पाणी ही दुष्ट प्रथा बंद केल्यामुळे महारा-मांगाच्या हातचे पाणी प्यावे लागू नये म्हणून मुरादाबादहून अमृतसरपर्यंत पाण्याला स्पर्श न करणारे पाकिस्तानात स्थलांतर केलेले एक मियाभाई, पाकिस्तानात कायम जाऊनसुद्धा आपण हिंदुस्तानी माता आहोत असे सांगणारी स्त्री, कलकत्त्यात उद्योग थाटून बंगाली मुसलमानांना खड्यासारखे दूर ठेवणारे

खानबहादुर डोसानी, कॉंग्रेसतर्फे दोनदा स्वतंत्र भारतात लोकसभेचे तिकिट मिळवलेले, पण स्वतःचा जावई पाकिस्तानी तुरुंगात असताना तेथे जाऊन आपली स्वतःची आर्थिक स्थिती सुधारता येईल, अशी आशा राखणारे सय्यद बद्रुदुजा, मुसलमानविरोधी मुसलमान म्हणून ख्याती असलेले हसनूल रहमान, स्वतः बिहारी मुसलमान असून बंगाली जीवनाशी समरस झालेले व स्वतःच्या मुलाला वेदकालीन पुशान हे नाव ठेवणारे अयूब, अतिदारिद्र्यामुळे संध्याकाळपासून रात्रीपर्यंत राहिलेल्या अतिथींचा कसलाही पाहुणचार करू न शकलेले मुसलमान खेडूत, असामी व बंगाली मुसलमानांतील संघर्ष व स्पर्धा इत्यादींचे हमीदने केलेले वर्णन वाचून मुसलमान समाजाविषयी, त्याच्या एकसंधतेबद्दल काही भ्रम असले तर ते दूर झाल्यावाचून राहणार नाहीत ! मैत्रेयीदेवी, पन्नालाल दासगुप्ता, मुसलमान विधवेशी विवाह केलेला ब्राह्मण ठाकूर, जुन्या काळात मन गुंतून राहिलेले ताराशंकर बॅनर्जी, तर्कशुद्ध विचारसरणीचा परमोच्च बिंदू गाठलेले अन्नदाशंकर रॉय, स्वप्नसृष्टीत वावरणारे बंगाली बुद्धिजीवी या सर्वांच्या व्यक्तिरेखा वाचल्या म्हणजे हमीदने आपला जन्म समाजसुधारणा यज्ञात अर्पण करण्याऐवजी यासारखी नुसती स्वभावचित्रे रेखाटण्यात जरी घालवला असता तरी तो देशातला एक सर्वोत्कृष्ट लेखक म्हणून पुढे आला असता. आपल्या साहित्यातून अशा तऱ्हेच्या व्यक्तिरेखा अगदी अपवादानेच आढळतात. हमीदने जे सत्य शोधण्याचा प्रयत्न केला तसा फारच थोड्या साहित्यिकांनी किंवा विचारवंतांनी केला असेल.

हमीदची बुद्धी असामान्य होती. तिच्या तल्लखपणाचे विविध पैलू त्याच्या प्रत्येक भेटीच्या वेळी ध्यानात येत. अल्पशिक्षित असूनही त्याला वाचनाची आवड विलक्षण होती. शेकडो पुस्तकांतील महत्त्वाचे संदर्भ सांगताना त्याला अडचण पडत नसे. वादविवादाच्या वेळी आपल्या तर्कशुद्ध विचारांनी तो इतरांना अगदी सहजपणे हरवू शके. चौथ्या लेखात कलकत्याच्या कालिघाट लायन्स क्लबमध्ये झालेल्या व्याख्यानाचा उल्लेख आहे. 'आपण मुस्लिम सामाजिक

सुधारणांचा आग्रह का धरता ? धर्माच्या कायद्याचा हिंदू–मुस्लिम परस्पर-संबंधाशी काय संबंध आहे ? ' या प्रश्नांना हमीदने जे उत्तर दिले त्याने प्रश्नकर्ता निरुत्तर झाला. असले काही प्रसंग पुढे मी स्वतःही पाहिले आहेत.

हमीदला वादात हरविता येत नसे म्हणूनच जनसंघाचा किंवा आर. एस. एस.चा एजंट, पाखंडी मुसलमान, स्त्री-लंपट, अनैतिक विचार-सरणीचा, पाखंडी यांसारखे असंख्य आरोप त्याच्यावर नेहमी केले जात. त्याच्या शेवटच्या आजरात त्याच्या दोन्ही किडनी निकामी झाल्या. कोणा तरी मूत्रपिंडदात्याची आवश्यकता होती. या शोधात किती तरी कटू अनुभव आले. त्याला डुकराची किडनीच बसविली पाहिजे अशा अर्थाची पत्रेही येत ! त्याच्या-वर अनेकदा हल्ले झाले. समाजसुधारणांचे कंकण बांधून पुढे जाणाऱ्या सर्वांनाच या प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागते. हमीद निर्भय होता. त्याला अनेक अनुयायी मिळाले. इस्लाम धर्म, संस्कृती व इतिहास यांचा मी जो थोडाफार अभ्यास केला आहे त्यावरून हमीदसारखा मुसलमान विरळाच, हे माझे तो जिवंत असतानापासूनचे मत होते. जोतिबा, आंबेडकर, आगरकर, दयानंद यांसारखी थोर मंडळी प्रत्येक पिढीत जन्माला येत नाहीत. स्वतंत्र हिंदुस्थानच्या मोकळ्या वातावरणातच हमीदसारखा सुधारक निर्माण होऊ शकला. इतरत्र सर्वच सनातन्यांनी त्या समाजाला ग्रासून टाकले आहे.

पण हमीदचे महत्त्व तो मुसलमान सुधारक होता यातच नाही. शेकडो बिगर-मुस्लिम विचारवंतांवरसुद्धा हमीदचा प्रभाव होता. कारण तो अस्सल भारतीय होता !

मुंबई

आंबेडकर जयंती

१४–४–१९८२

# हमीद : उगवता नवा विचार

## नरहर कुरुंदकर

हमीद दलवाईंना महान विचारवंत म्हणून कीर्ती मिळवण्याची इच्छा नव्हती. त्यांना समाजपरिवर्तनाचे आंदोलनच अधिक प्रिय होते. मुहंमद पैगंबर आणि कुराण यांबाबत चर्चा करून दररोज समाजाचे मन दुखवावे आणि पुरुषार्थ मिरवावा, असेही त्यांना वाटत नव्हते. मुस्लिम समाजाने नास्तिक व अश्रद्ध झालेच पाहिजे असा त्यांचा आग्रह नव्हता. समाजाचे आमूलाग्र परिवर्तन होणे आवश्यक आहे, इतके मान्य असणाऱ्या कार्यकर्त्यांनी आरंभ म्हणून कोणताही एक छोटासा कार्यक्रम घ्यावा आणि सुधारणेला समाज तयार करावा, हे दलवाईंना मान्य होते. इस्लामवरील श्रद्धा, पैगंबरावरील श्रद्धा, इस्लामच्या धार्मिक व राजकीय इतिहासावरील श्रद्धा या सर्व चर्चा बाजूला सारून, तलाकपीडित महिलांचा प्रश्न हाती घेऊन सामाजिक आंदोलन करायला ते तयार होते.

गुलाम राष्ट्रातील स्वातंत्र्य लढे पुनःपुन्हा पराभूत होतात म्हणून गुलामगिरी अमर राहील असे आपण मानणार आहोत काय? दहा उठाव फसतील, पण शेवटी संपणार आहे ती गुलामगिरी! अतिशय अजिंक्य आणि बलवान असणाऱ्या तटबंद्या शेवटी कोसळत चाललेल्या मावळत्या शक्ती आहेत. त्या मावळत्या शक्तींचा विजय फार काळ टिकणारा नसतो. मुस्लिम समाजही बदलत जाणार आहे. त्या समाजातही नवे विचार वाढतच जाणार आहेत. थोडा उशीर लागेल हे मान्य केले तरी अंधश्रद्ध, जळमटलेली मने कायमची गुलाम राहणार नाहीत. परंपरावाद्यांचे बळ हे शेवटी मावळत्या शक्तींचे बळ असते.

दलवाई हा उगवता नवा विचार आहे. दलवाईंच्यावर ज्यांची श्रद्धा आहे त्यांनी दलवाईंचा विचार वेगाने पसरत कसा जाईल, याची काळजी घ्यावी. पराभव दलवाईंचा होणार नसून परंपरावाद्यांचा होणार आहे. भवितव्याच्या या दिशेत बदल होण्याची शक्यता अजिबात नाही.

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. ह्या विलक्षण विसंगती ! | ... | ... | १७ |
| २. बदललेले वातावरण | ... | ... | २२ |
| ३. दोन अजब मुस्लिम | ... | ... | २८ |
| ४. ग्रॅंड हॉटेलातील कार्यक्रम | ... | ... | ३२ |
| ५. हिंदू जातीयवादावर कडाडून हल्ला | ... | ... | ३८ |
| ६. अजब आदरातिथ्याचा अनुभव | ... | ... | ४३ |
| ७. पूर्व पाकच्या सीमेवर | ... | ... | ४९ |
| ८. समंजस मुस्लिम स्त्रिया | ... | ... | ५५ |
| ९. हमदी बे यांचे विचित्र विचार | ... | ... | ६० |
| १०. मानसिक तणाव | ... | ... | ६५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०२०
दा. क्र. 23433
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

. ९ .

# ह्या विलक्षण विसंगती !

स्वातंत्र्यपूर्वकाळी रत्नागिरी जिल्ह्यातील एका खेडेगावातील मुस्लिम नागरिकांनी आपल्या गावात मुस्लिम लीगची शाखा काढावयाचे ठरवले. त्या गावात एक हिंदू दैवत होते. या दैवतावर सर्वच गावकऱ्यांची श्रद्धा होती, मुस्लिम नागरिकांची देखील ! गावातील कोणतेही शुभकार्य या दैवताला नारळ दिल्याखेरीज होत नसे, मुस्लिम नागरिकांचे देखील. गावातील कोणतेही शुभकार्य या दैवताला नारळ दिल्याखेरीज होत नसे. मुस्लिम लीगच्या प्रस्थापनेचे शुभकार्य करताना देखील गावातील दैवताला समारंभपूर्वक नारळ अर्पण केला गेला आणि मग मुस्लिम लीगची स्थापना केल्याचे जाहीर केले !

मुस्लिम जीवनातील या चमत्कारिक विसंगतीने मी अनेक दिवस अस्वस्थ राहिलो होतो. जीवनात अशा विसंगतीची उदाहरणे पदोपदी आढळून येतात, असे त्याचे मनाशी स्पष्टीकरण करण्याचाही प्रयत्न मी करून पाहिला, परंतु त्याने मनाचे समाधान होऊ शकले नाही.

भारत–पाकिस्तान युद्धाच्या काळात काश्मीरला जायचा योग आला. श्रीनगरात ज्या एका हॉटेलात उतरलो होतो त्याचे मालक पंजाबी हिंदू होते, परंतु नोकर काश्मिरी मुसलमान होता. कसा कुणास ठाऊक त्याला मी मुसलमान असल्याचा पत्ता लागला. एका सकाळी बेसीनपाशी मी पाणी पिण्यासाठी ग्लास धूत होतो. मला ग्लास धुताना पाहाताच तो लगबगीने पुढे आला. माझ्या

हातातून ग्लास घेऊन स्वतः धूत तो मला म्हणाला, ' मेरे साथ आप परेज मत कीजिये. मैं मुसलमान हूँ और आप भी मुसलमान हैं ! '

मी नुसताच हसलो. त्याच्याशी काय बोलावे हे मला कळेनासे झाले. काही बोलता येण्यासारखेही नव्हते.

' आप कल कहाँ गये थे ? ' मग त्याने विचारले.

मी त्याच्या बोलण्याला उत्साहाने प्रतिसाद देत नाही हे त्याच्या लक्षात आले असावे.

' हाजीपीर. ' मी त्याला सांगितले.

हाजीपीरच्या उल्लेखाने त्याचा चेहरा काळवंडला. त्याने अस्वस्थपणे विचारले, ' तेथे काय पाहिलेत ? '

' लढाई चाललेली पाहिली. '

' कुणाची जीत होत आहे ? '

' हिंदुस्तानी फौजेची. '

कसली तरी अशुभ वार्ता ऐकल्यासारखा त्याचा चेहरा पडला, अधिकच पडला !

मग तो बोलू लागला— त्वेषाने. त्या बोलण्यातून त्याच्या भावनांचा होत असलेला उद्रेक मला जाणवला. पाकिस्तान्यांना भारतीय सैन्य मागे रेटीत आहे, याचे त्याला अतिशय दुःख झाले होते ! पाकिस्तानी घुसखोरांनी चोरून असे मदतीला कशाला यायचे ? यायचे तर उघड उघड यायचे. ' चोरून येऊन आमच्या दुःखातच त्यांनी भर टाकली ' असे मत त्याने अतिशय कडवटपणे व्यक्त केले. ' तुम्हा भारतीय मुसलमानांसाठी आम्ही अद्याप संयम पाळला आहे ', असेही त्याने बोलून दाखवले.

मी विचारले, ' तुला पाकिस्तानात का जावेसे वाटते ? येथे काय दुःख आहे ? कशाची कमतरता आहे ? '

तो उत्तरला, ' दुःख कसलेच नाही. कमतरताही कसली नाही. येथे रोटी स्वस्त मिळते. लोकांची परिस्थिती देखील पाकिस्तानी काश्मिरातील लोकांहून खूप बरी आहे, परंतु तेवढ्याने संपत नाही बाबूजी. ' आणि मग त्याचे डोळे लकाकले. अतिशय भावनात्मक स्वरात तो मला म्हणाला, ' आखिर इस्लामके झंडे का भी कोई खयाल करना चाहिये या नहीं ? '

श्रीनगरच्या हॉटेलातील नोकराचे हे उद्‌गार अनेक दिवस माझ्या मनात रेंगाळत राहिले. अजूनही रेंगाळत राहिले आहेत. त्याच्या भावनात्मक युक्तिवादापुढे माझ्या तार्किक दृष्टिकोणाचे मूल्य शून्यवत् असल्याचे मला त्या दिवशी जाणवले.

आदल्या दिवशी हाजीपीरला गेलो असताना सैन्याला रसद पुरवणाऱ्या काही मुसलमान हमालांचे जिणे मला अद्याप आठवत आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी तेथे खूप पाऊस पडून गेला होता आणि खिंडीचा तो अरुंद रस्ता काही ठिकाणी निसरडा बनला होता. खिंडीत पुढे पुढे सरकणाऱ्या सैन्याला खेचरांच्या पाठीवरून व हमालांकरवी रसद पुरवण्याचे काम चालू होते. त्या खेचरांचे आणि हमालांचे पाय सरकत होते—आणि तरीही ते जिद्दीने पुढे चालत होते. अधूनमधून शत्रूच्या ठाण्याच्या दिशेने डागल्या जात असलेल्या डोंगरी तोफा जवळच उभ्या होत्या. युद्धातील अवघे नाट्य, भयानकता आणि गंभीरता तेथे एकवटली होती. त्या गंभीरतेने आम्हा पत्रकारांची मनेही भारावली गेली होती, परंतु त्या हमालांचे चेहरे विलक्षण भावनाशून्य दिसत होते !

ते धंदेवाईक हमाल नव्हते, उरी विभागातील खेड्यांतून आणलेली ती माणसे होती. आमच्याबरोबर युद्ध-आघाडीला भेट द्यायला आलेल्या एका स्थानिक मुसलमान काँग्रेस कार्यकर्त्याच्या बोलण्यावरून ती माणसे काँग्रेस कार्यकर्त्यांनी गोळा करून आणली होती ! तथापि त्यांच्या चेहऱ्यावर स्वयंस्फूर्त उत्साह भासत नव्हता. तसेच दिल्या गेलेल्या कामाबद्दलची नाराजीही आढळून येत नव्हती. त्यांचे चेहरे काही सांगतच नव्हते ! अशी अबोल चेहऱ्याची माणसे मी पाहिलीच नव्हती. अशी भावनाशून्यता अनुभवली नव्हती.

पासष्ट साली पाकिस्तानात गेलो असताना लाहोरहून कराचीला गाडीने जात होतो. या गाडीत उत्तर प्रदेशमधील मुरादाबाद या आपल्या जन्मस्थानाला भेट देऊन, आता पाकिस्तानी बनलेला एक नागरिक परत कराचीला चालला होता. माझ्या शेजारीच तो बसला होता. त्याच्याबरोबर दोनतीन स्त्रियाही होत्या. आपापसांत त्यांचे बोलणे चालले होते. सिंधच्या वाळवंटी प्रदेशातून गाडी चालली होती आणि बाहेर भराभर मागे सरकणाऱ्या वाळूचे ढीग मी न्याहाळत होतो.

आपसात बोलताना एकाने मध्येच मला विचारले, ‘ काय हो, तुमच्याकडे रेल्वे गाड्यांत वेगळे पाणी देण्याची प्रथा बंद केलेली आहे काय ? ’

‘ होय ’ मी सांगितले, ‘ आमच्याकडे आता हिंदू पाणी, मुसलमान पाणी असा पूर्वीचा भेदभाव रद्द केला गेला आहे.’

‘ फार वाईट केलेत. मी मुरादाबादहून अमृतसरला येईपर्यंत वाटेत पाणी प्यालो नाही ! न जाणो, कोणा महारा—मांगाच्या हातचे पाणी प्यायला लागायचे ! ’

मी त्यांना विचारले, ‘ तुम्हाला महारा-मांगाचे पाणी न चालायचे कारण ? तुम्ही काही उच्चवर्णीय हिंदू नव्हेत ! मुसलमानांत अस्पृश्यता पाळत नाहीत. किंबहुना इस्लामने सामाजिक समता आणली, असा मुसलमानांचा दावा आहे. ’

‘ असेल, पण मला त्यांच्या हातचे पाणी पिववणार नाही. अहो, माझ्यावर हे लहानपणापासूनचे संस्कार आहेत. ते मला झटकून टाकता येणार नाहीत ! छे: छे: ! अजीबात जमणार नाही ते ! आणि शिवाय हिंदूंच्या पूर्वजांनी जे सामाजिक नियम केले ते चुकीचे कसे असतील ? ’

ते बोलणे तेथेच थांबले. कारण मला त्यांच्याशी वाद घालायचा नव्हता. मी त्यांच्या दृष्टिकोणाने आश्चर्यचकित होऊन काही वेळ विचार करीत राहिलो. मग मनात विचार आला, कोणत्या इच्छेने याला पाकिस्तानला आणले ?

हा प्रश्न विचारायचा मोह मला आवरला नाही, परंतु ते गृहस्थ आधी हे सारे बोलल्याचे जणू विसरले आणि संतापी सुरात म्हणाले, ‘ तुमच्या हिंदुस्थानात राहिलो असतो तर हिंदूंनी आम्हांला शूद्र बनविले असते. उरलेल्या मुसलमानांचे तेच होणार आहे ! अशा अवस्थेत मला राहायचे नव्हते. कधीच राहणार नाही. ’

आणि कराचीला एका सरकारी अधिकाऱ्याच्या पत्नी भेटल्या. त्या पूर्वीच्या गोव्याच्या आहेत. आपला मुलगा एकदा भयंकर आजारातून कसा बरा झाला, हे त्या मला सांगत होत्या. ज. इस्कंदर मिर्झा यांचे खाजगी डॉक्टर कर्नल सखर यांनी मुलावर औषधोपचार केले. हे सांगताना त्या म्हणाल्या, ‘ मी अतिशय घाबरले होते. ’ कर्नल सखर धीर देत म्हणाले, ‘ तुम्ही फारच काळजी करता.’

मी त्यांना म्हणाले, ‘ हे स्वाभाविकच आहे. आखिर मैं मां हूँ, हिन्दुस्तानी मां हूँ ! अपने बच्चेका ख्याल न करू तो क्या करू ? ’

या बाई स्वतःला हिंदुस्तानी माता असे अद्यापिही का म्हणवून घेतात ? त्या आपल्याला पाकिस्तानी माता का समजत नाहीत ?

वर उल्लेख केलेल्या प्रसंगांतून मुस्लिम मनाचे एक चमत्कारिक, गोंधळात टाकणारे चित्र उभे राहते.

श्रीनगरच्या त्या हॉटेलतील मुस्लिम कर्मचाऱ्याला भारतात सुस्थिती लाभत असली तरी इस्लामच्या निशाणाचेच आकर्षण अधिक वाटते. हाजीपीरच्या खिंडीत भारतीय सैन्याला रसद पुरवणाऱ्या मुसलमान हमालांचे चेहरे बोलकेपणा हरवून बसतात. मुरादाबादचा तो गृहस्थ पाकिस्तानात जातो, त्या देशाला आपली मायभूमी मानतो; आणि तरीही हिंदू जातिव्यवस्थेचे समर्थन करतो. आणि आमच्या रत्नागिरी जिल्ह्याच्या एका खेड्यातील मुसलमान हिंदू देवाला विधिपूर्वक नारळ अर्पण करून मुस्लिम लीगची स्थापना करतात !

हे सारेच चित्र विलक्षण गोंधळात टाकणारे आहे.

जीवनातील विसंगती म्हणून या प्रकारांचे स्पष्टीकरण पुरेसे होत नाही. तसे करणे म्हणजे आत्मवंचना करून घेणे आहे. या विसंगतीची एकच आपल्याला सोयीस्कर बाजू आम्ही कधी कधी ग्राह्य मानतो आणि दुसरीकडे दुर्लक्ष तरी करतो, किंवा ती अस्तित्वातच नाही असे गृहीत धरतो. या विसंगतीमागील प्रेरणा समजावून घेण्याचा, त्यामागील मुस्लिम मनाचे सम्यक् स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न आम्ही क्वचितच केला आहे.

× × ×

. २ .

# बदललेले वातावरण

मुस्लिम मनाच्या प्रेरणा मलाही नीट समजलेल्या नाहीत. भारतीय उपखंडातील मुसलमानांच्या एकमुखी मागणीमुळे देशाची फाळणी झाली. या मागणीला भारतीय मुसलमानांचा जो आंधळा पाठिंबा मिळाला त्यामागील प्रेरणा कोणती ? आपली नेमकी मायभूमी कोणती असावी, या कल्पनेला पाठिंबा देताना मुसलमान समाज आणि विशेषतः मुस्लिम बुद्धिजीवी वर्ग भूगोलाच्या मर्यादा कसा विसरला ? किंबहुना असेही म्हणता येईल की मुसलमानांची मायभूमी निर्माण झाल्यानंतर तो स्वतःच त्या मायभूमीला भौगोलिकदृष्ट्या पारखा होणार होता, ही त्यामागील विसंगती त्याच्या कशी लक्षात आली नाही ?

स्वातंत्र्य मिळाल्याला आता वीस वर्षे झाली. फाळणीच्या काळातील दुर्दैवी घटनांचा गांधीजींच्या हत्येच्या अंतिम पर्यवसानात शेवट झाला. पंजाब आणि दिल्ली व दिल्लीच्या सभोवतालचा प्रदेश वगळला तर भारतातील मुसलमानांचे सामुदायिक स्थलांतर झाले नाही. त्यांच्या जीवनात मोठ्या प्रमाणावर व्यत्यय आला नाही. एका धर्मनिरपेक्ष राज्यघटनेने त्यांना समान अधिकार मिळवून दिले. संयुक्त मतदारसंघाच्या निमित्ताने बहुसंख्याकांबरोबर राज्यपद्धतीतील संयुक्त भागीदारी अनुभवाला येऊ लागली. सरकार बनवण्याच्या आणि मोडण्याच्या प्रक्रियांत तोही इतरांबरोबर समानतेच्या अधिकाराने भाग घेऊ

लागला आणि धर्मनिरपेक्षतेची काटेकोर अंमलबजावणी होत नसली तरी धर्म-निरपेक्षता तत्त्वतः मान्य केली गेली. एक विचार म्हणून तो या देशातील राज्य-पद्धतीचा एक कायमचा आधार-स्तंभ बनला.

वीस वर्षांनंतर मुसलमानांची एक नवी पिढी आता उदयाला आली आहे. ज्या एका तिसऱ्या पक्षाला आम्ही हिंदु-मुस्लिम संघर्षाबद्दल दोष देतो तो येथे राहिलेला नाही. मुस्लिम जातीयवादाला खतपाणी घालावयास कारणीभूत ठरणारा वेगळा मतदारसंघही आता उरलेला नाही. मुस्लिम जातीयवादाची आक्रमक शक्ती आता कार्यप्रवण होण्यास अनुकूल परिस्थितीही राहिलेली नाही. अशा या वातावरणात मुस्लिम मनाच्या प्रेरणांचे स्वरूप आता कोणते आहे? एका धर्मनिरपेक्ष भारतीय समाजात मुस्लिम समाजाची एकात्मता घडवून आणणाऱ्या प्रवृत्ती नव्या पिढीत कितपत निर्माण झाल्या आहेत?

हे आणि असेच प्रश्न माझ्या मनात गेला काही काळ सतत उभे रहात होते. त्यांची उत्तरे शोधायची तर भारतीय मुस्लिम समाजाचे मन समजून घेणे आवश्यक होते. या मनाला भारतीय भौगोलिक आणि सामाजिक वैचित्र्या-सारखीच विचित्रता लाभलेली आहे आणि तरीही ते एक वेगळेच मन आहे हे मला जाणवते. त्याचे दर्शन घ्यायचे तर भारताची यात्रा केली पाहिजे असे मला वाटू लागले.

मी कलकत्त्यात खानबहादूर डोसानींना भेटायला गेलो. खानबहादूर बंगाली मुसलमान नाहीत, कलकत्त्यातील व्यापारी वर्तुळात जम बसवलेल्या बिगर-बंगाली मुसलमानांतील ते एक प्रमुख. त्यांची चित्रपट वितरणसंस्था आहे. चित्रपटगृहे आहेत. आणि इतरही काही उद्योगधंदे आहेत. 'ओरिएंटल चेंबर्स ऑफ कॉमर्स' या मुस्लिम कॉमर्स संघटनेचे ते एक प्रमुख आधारस्तंभ आहेत. मुंबईचे शेरीफ श्री. एच. एच. इस्माइल यांनी मला त्यांच्यासाठी ओळखपत्र दिले होते आणि कलकत्त्याच्या विविध थरांतील मुसलमानांची माझ्याशी भेट घालून द्यावी, अशी त्यात त्यांना विनंती केली होती.

डोसानींनी माझे स्वागत केले. पत्र वाचून मला विचारले, ‘ तुमची आणि इस्माइल यांची ओळख कशी ? ’

‘ माझी प्रत्यक्ष ओळख नाही. डॉ. रफिक झकेरियांनी करून दिली. मी इकडे येणार असल्याचे सांगितले; तेव्हा त्यांनी इस्माइलना पत्र द्यायला सांगितले.’

‘ ओह, आय सी ! ’ ते उद्‌गारले, ‘ तुम्हाला खरे सांगू ? बंगाली मुसलमान आमच्या चेंबर्समध्ये नाहीत. तुम्हाला मी कितपत उपयोगी पडेन, याविषयी मला शंका वाटते. तुम्ही असे करा, आमच्या चेंबर्सचे चिटणीस श्री. सालेजी आहेत. त्यांना भेटा.’

त्यांनी सालेजींना फोन करून माझ्या कामाची माहिती दिली. मी निघालो.

‘ तुम्हांला काही अडचण आली तर मला पुन्हा येऊन भेटा.’ असेही त्यांनी सांगितले.

●

सालेजींचे ऑफिस जवळच होते. सालेजी मला म्हणाले, ‘ आपण आधी चहा घेऊ. मग बोलू.’

त्यांनी चहा मागवला. मग ते बोलू लागले. माझ्या कामाविषयी त्यांनी माहिती विचारली. मला भारतीय मुसलमानांवर पुस्तक लिहायचे आहे आणि त्याकरता मी देशभर फिरणार आहे, हे मी त्यांना सांगितले.

‘ तुम्हाला मुसलमानांविषयी कोणती माहिती हवी ? ’

‘ मला चार लोकांना भेटून त्यांच्याशी चर्चा करायला हवी आहे, ’ मी त्यांना सांगितले.

‘ परंतु चर्चा कशावर करणार ? ’ त्यांनी विचारले.

थोडा वेळ विचार करून मी म्हणालो, ‘ मुस्लिम समाजाच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नावर मला चर्चा करावयाची आहे. ’

‘ मी इंग्रजीत बोलत होतो. इंटिग्रेशन हा शब्द एकात्मतेकरता वापरला होता.

सालेजींनी मला एकदम विचारले, ‘ तुमचे म्हणणे काय आहे ? मुसलमानांचे हिंदूंशी इंटिग्रेशन व्हावे ? ’

‘ मी धर्मनिरपेक्ष भारतीय समाजात एकात्मता कशी साधता येईल ? ’ हा प्रश्न केला होता.

‘ म्हणजे तेच ! धर्मनिरपेक्षता म्हणजे तरी काय ? हिंदू धर्मनिरपेक्ष आहेत,

हा तुमचा भ्रम आहे. मुसलमान हे अलगच राहिले पाहिजेत. त्यांनी आपल्या संख्येच्या बळावर आपले राजकारण उभारले पाहिजे ! '

हा पहिलाच धक्का मला अनपेक्षित होता. मी अखेर त्यांना म्हणालो, ' मी येथे कुणाला भेटलो असताना मुस्लिम समाजाचे मनोगत मला कळू शकेल ते सांगा. '

' आपण मुल्ला जानमहंमदना भेटा. सय्यद बद्रुदुजांना भेटा. ही माणसे येथील मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी आहेत. '

त्यांनी प्रा. हुमायून कबीर यांचे नाव घेतले नाही, हे मला जाणवले !

मुल्ला जानमहंमद आणि सय्यद बद्रुदुजा यांच्या नावाशी मी परिचित होतो. चौसष्ट साली कलकत्त्याला झालेल्या दंगलीच्या वेळी तसेच पासष्टच्या भारत–पाकिस्तान युद्धाच्या वेळी या दोघांनाही भारत संरक्षण कायद्याखाली स्थानबद्ध करण्यात आले होते !

त्यांना भेटायची मला उत्सुकता नव्हती. त्यांचे विचार मला माहीत होते. त्यांच्याशी चर्चा करण्यात माझा वेळ मला व्यर्थ घालवायचा नव्हता. कबीर दिल्लीत असल्यामुळे त्यांना येथे भेटता येण्याची खात्री नव्हती.

०

मग मला एका गृहस्थांची एकाएकी आठवण आली. मुंबईला मध्यस्थ प्रगती मंडळातर्फे ( सुधारणावादी बोहरा ) काही नवमतवादी बोहरांनी आपल्या धर्मगुरूंविरुद्ध सुरू केलेल्या आंदोलनाच्या निमित्ताने प्रगती मंडळाच्या काही व्यक्तींशी माझा परिचय झाला होता. प्रगती मंडळाचे अध्यक्ष श्री. नोमान कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडे एकदा कलकत्त्याचे एक मोठे बोहरा गृहस्थ भेटले होते. ' सार्वजनिक कार्यातील आपले हे गुरू आहेत ' या शब्दांत कॉन्ट्रॅक्टरनी माझी त्यांच्याशी ओळख करून दिली होती. आपण कलकत्त्याला एक उर्दू दैनिक काढीत असल्याचे त्यांनी सांगितल्याचे लक्षात होते. परंतु त्यांचे नाव मला आठवेना. अखेर सालेजींना मी विचारले, ' येथे एक बोहरा गृहस्थ उर्दू दैनिक काढत असतात, त्यांचे नाव काय ? '

' टी. एम्. जरीफ.'

' बरोबर, जरीफ. त्यांचे नाव आठवत नव्हते.'

' तुमची आणि त्यांची ओळख आहे ? '

' आहे थोडीशी. एकदा मुंबईला भेटले होते.'

त्यांचा पत्ता आणि फोन नंबर सालेजींनी दिला.

मला ते म्हणाले, ' त्यांच्यापाशी कबीरांचा उल्लेख मात्र करू नका.'

'का ?'

'त्यांचे संबंध चांगले नाहीत.'

'ठीक आहे.'

मी त्यांच्याकडून जरीफना त्यांच्या ऑफिसात फोन केला. सुदैवाने ते फोनवर भेटले. मी त्यांना मुंबईला भेटल्याची आठवण करून दिली, पण त्यांना मी भेटल्याचे आठवेना. परंतु कॉन्ट्रॅक्टरांचे नाव सांगितल्यानंतर ते खुष झाले. 'तो भय्या, आके मिलो. दोपहरमें आना यहाँ.' ते म्हणाले.

मी सालेजींचे आभार मानले. त्यांनी 'काही काम लागल्यास पुन्हा या' असे सांगितले. परंतु मी पुन्हा त्यांच्याकडे अथवा डोसानींकडे गेलो नाही. त्यांना भेटताच आपण चुकीच्या लोकांकडे पोचल्याचे माझ्या लक्षात येऊन चुकले होते!

जरीफ दुपारच्या वेळी माझी वाट पाहातच ऑफिसात बसले होते.

'एवढ्या दूर तुम्ही मला शोधत आलात याचा फार आनंद झाला' असे म्हणून त्यांनी माझा प्रेमभराने हात पकडला. त्यांना मी एकदा भेटल्याची मग आठवण आली. 'ओ – हो – तुम्ही माझ्याच विचारांचे आहात,' ते हर्षभराने उद्गारले, 'तुम्ही माझे मित्र आहात, सहकारी आहात.'

त्यांना मी माझ्या कामाची त्या दिवशी कल्पना दिली आणि त्यानंतर अनेकदा भेटलो. एकदा त्यांनी काही मुसलमान नगरपित्यांबरोबर माझी चर्चा घडवून आणली. एकदा काही मोजक्या व्यक्तींबरोबर मला आपल्या घरी जेवायला बोलावले. कलकत्ता महानगरपालिकेतील कॉंग्रेस पक्षाचे प्रतोद श्री. रऊफ बद्रुदुजा यांचे एक चुलतबंधू आणि कलकत्ता विद्यापीठातील पर्शियनचे प्रमुख प्रा. हिरालाल चोप्रा यांची या प्रसंगीच ओळख झाली.

हिरालाल चोप्रा अद्यापिही या प्रश्नाकडे भावनात्मक दृष्टिकोणातून पाहात असलेले मला आढळून आले. 'श्री. इक्बाल यांचे तत्त्वज्ञान जातीयवादी नव्हते,' असा विचार त्यांनी एकदा व्यक्त केला. कवी इक्बाल आणि राजकारणी इक्बाल यांची ते गल्लत करीत असावेत, असे त्या बोलण्यावरून मला वाटले. मी त्यांना इक्बालनी मौ. हुसेन अहमद मदनींवर केलेल्या एका काव्यमय हल्ल्याची आठवण करून दिली.

भारत हे एक राष्ट्र आहे, असे मौ. मदनी कुठे तरी म्हणाले होते. इक्बाल यांच्या मते इस्लाम हे एक राष्ट्र आहे. आणि भारतातील इस्लामी जमात हा

एक अलग राष्ट्रगट आहे. या त्यांच्या मतांमुळेच इक्बालना मदनींचा राग आला होता.

❦

श्री. रऊफ यांची मते तर अतिशय परंपरागत भासली. जरीफ यांनी माझी भेट घडवून आणलेल्या एकाही मुसलमानात मला बदललेल्या परिस्थितीची जाणीव दिसून आली नाही.

' या साऱ्यांबरोबर तुमचे कसे जमते ? ' असे मी एकदा जरीफना विचारले. तेव्हा ते म्हणाले, ' न जमवून काय करू ? ते आणि मी एकाच काँग्रेस संघटनेत आहोत. मी किती लोकांशी भांडू ? आणि भांडून काही उपयोगही नाही. पूर्वीचे लीगवाले सगळ्यांत सुखी आहेत. भय्या, आज ते येथील काँग्रेसचे धुरीण झाले आहेत ! मला म्हणतात– ' जरीफ, हम पहले बिरयानी खाते थे, अभी भी बिरयानीही खाते हैं, लेकिन तुम उस वक्त भूखों मरते थे, अभी भी वैसेही मर रहे हो ! '

❦

एकदा प्रा. हुमायून कबीर यांचा विषय निघाला. सालेजींनी मला त्यांच्यापाशी कबीरांचा उल्लेख न करण्याबाबत दिलेल्या सूचनेचाही मी त्यांच्याशी बोलताना उल्लेख केला. ते हसून म्हणाले, ' सालेजीला, तुमचे माझे विचार कुठे तरी जुळतात आणि म्हणून मी तुमच्यावर चिडणार नाही हे कसे कळावे ? '

' पण आपण कबीर यांच्याबद्दल बोलत होतो ' मी त्यांना आठवण करून दिली.

' होय, होय.' त्यांचा चेहरा बदलला. ' त्यांचे तुम्ही नाव काढू नका ! '

' पण का ? '

' ही इज ट्रेचरस. ते कुणाशीही इमान बाळगणार नाहीत. आपल्या स्वार्थासाठी कुणाशीही कसलाही सौदा करतील. उद्या पाकिस्तानचा भारताविरुद्ध युद्धात विजय झाला तर आयुबखानांच्या स्वागताला पहिल्या प्रथम कबीर रस्त्यावर जाऊन उभे राहतील ! '

× × ×

. ३ .

# दोन अजब मुस्लिम

जिद्द आणि नैराश्य यांचे चमत्कारिक मिश्रण जरीफ यांच्या स्वभावात आता भिनले होते. गेली चाळीस वर्षे ते सार्वजनिक जीवनात वावरत होते. मुस्लिम जातीयवादाबरोबर लढत होते. बोहरा समाजात धर्मसुधारणेच्या चळवळी आणावयास ते कारणीभूत ठरले. सार्वजनिक कार्याच्या निमित्ताने बंगालच्या आणि भारताच्या सर्व राष्ट्रीय नेत्यांशी त्यांचा जवळून संबंध आला.

ओबेदुल्ला सिंधी हे एक क्रांतिकारक, धर्मपंडित. त्यांच्या घरी काही काळ ते राहिले. मौ. आझाद नेहमी त्यांच्याकडेच यायचे. मौ. आझादांची कलकत्त्या-मधील सर्व खाजगी कामे ते करायचे, परंतु जरीफ त्यांच्याबद्दलही अतिशय कडवटपणे बोलले. आझादांनी अधिक दूरदृष्टी दाखवली असती, मुस्लिम राजकारणाला नीट वळण लावले असते तर सारी शोकांतिका टळली असती, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांचे हे मत बरोबर नाही, हा भाग वेगळा. विशेषतः आझादांनी आपल्या 'इंडिया विन्स फ्रीडम' या पुस्तकात नेहरू-पटेलांना दोष देण्याचा जो प्रयत्न केला आहे– त्याबद्दल त्यांनी अतिशय नापसंती व्यक्त केली. पटेलांपाशी भांडायचे धैर्य मौ. आझादांमध्ये कधीच नव्हते. पटेलांचे चुकत होते असे त्यांना वाटत होते. तर त्यांनी विरोध का केला नाही? पटेलांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर दोषारोप करण्याचा का प्रयत्न केला? हा पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रकार झाला!'

मी त्यांना विचारले, 'तुमचे धर्मगुरू सैफुद्दीन कसे होते?'

'ढोंगी, लबाड!' जरीफनी सैफुद्दीनना शिव्यांची लाखोली वाहिली. 'मी त्यांचा फार चाहता होतो, दलवाई' ते म्हणाले, 'पण स्वातंत्र्याच्या

वाटाघाटी चालू असताना दिल्लीला मला त्यांचे खरे स्वरूप कळून आले ! एक दिवस भेटायला गेलो असताना आज सैफुद्दीन भेटणार नाहीत, असे मला सांगण्यात आले. असे तोवर कधी झाले नव्हते. मला ते कधीही भेटायचे. मग माहिती काढली तेव्हा कळले की, ते जीनांना भेटायला गेले होते ! मला आश्चर्याचा धक्का बसला. हा मनुष्य असा विश्वासघातकी असेल, असे मला कधी वाटले नव्हते. त्या दिवसापासून मी त्यांच्याकडे पाठ फिरवली. त्यांचे सत्यस्वरूप उघडकीस आणायला सिद्ध झालो. वर्तमानपत्रांतून आणि इतरत्र त्यांच्या विरुद्ध आघाडी उघडली. गंमत अशी की, या लढाईत देखील जीनांनीच विजय मिळवला !

' सैफुद्दीन इतर नेत्यांकडे कधी गेले नाहीत ! नेहरूदेखील त्यांना भेटायला त्यांच्या घरी ४६ मध्ये आले होते, पण जीना आले नाहीत ! सैफुद्दीनना आपल्या घरी यावयास भाग पाडले. '

या संदर्भात त्यांनी जीनांचीही एक आठवण सांगितली. ते म्हणाले, ' सैफुद्दीन यांच्या वतीने मी एकदा, जीना येथे आले असताना, त्यांना भेटायला गेलो होतो. बोहरा जमातीविषयक मालमत्तेचा कायदा आमच्या संमतीने तयार केला जावा, अशी आमची तेव्हा मागणी होती. तेव्हाच्या मध्यवर्ती कायदे मंडळात जीनांनी ही भूमिका घ्यावी, अशी आमची इच्छा होती.'

' इस्पहानी या येथील एका श्रीमंत लीग-नेत्याकडे जीना उतरले होते. त्यांनी आधी आमची भेट घ्यायचेच नाकारले ! आम्ही परत फिरलो. तेवढ्यात इस्पहानींनी मला पाहिले आणि जीनांना थोडा वेळ द्यायची विनंती केली. लीगच्या कार्यकारिणीची बैठक असल्यामुळे आपल्याला वेळ नाही, थोडक्यात काय ते सांगा, असे आरंभीच जीनांनी सांगून टाकले ! आम्ही आमची भूमिका मांडली. ते स्वस्थपणे ऐकत होते. बोलता बोलता मी सैफुद्दीन यांच्यामागे बहुसंख्य बोहरा लोक आहेत, असे विधान केले. तेव्हा एकाएकी ते भडकले ! ' व्हॉट मेजॉरिटी— कसले बहुमत ? ' ते चिडून म्हणाले. ' मेजॉरिटी ऑफ लुनॅटिक्स— पागल लोकांचे बहुमत ! लोकांना खरोखरच काही कळते असे तुम्हाला वाटते काय ? उद्या कलकत्त्याच्या वेड्यांच्या तुरुंगातील वेडयांनी तुरुंगाचा दरवाजा उघडायला सांगितला आणि तुम्ही तो उघडलात तर ते वेडे हुगळी नदीत उडया टाकून जीव देतील ! लोकांना काही कळत नसते मिस्टर जरीफ. नेत्याने ते ठरवायचे असते. रोग्याला डॉक्टरने औषध विचारायचे

नसते. त्याला योग्य वाटेल ती उपाययोजना करायची असते. तसेच लोकांना काय हवे ते नेत्याने ठरवायचे असते!'

बोहरा शिष्टमंडळाच्या मागण्यांशी येथे आपल्याला कर्तव्य नाही. जीनांच्या मनोवृत्तीचे या बोलण्यातून जे दर्शन घडते ते महत्त्वाचे आहे.

जरीफ यांच्याकडे मी एक दिवसाआड तरी जायचो. मेच्या अखेरीला मी आसामला जायला निघालो आणि त्यांना सांगायला गेलो तेव्हा ते आश्चर्याने विचारू लागले, 'मला आधी सांगितले नाहीत? २१ ला माझ्या मुलाचे लग्न आहे. ते टाकून कुठे जाता?'

मी विमानाचे तिकीट काढले होते. परंतु त्यांनी ते आपल्या माणसाकरवी रद्द करून दुसऱ्या दिवशीचे आणून दिले! तिकीट रद्द केल्यामुळे जी रक्कम कापली गेली तीही द्यायचे नाकारले. लग्नाला उपस्थित राहिल्याखेरीज माझ्यापुढे गत्यंतर उरले नाही.

बद्रुदुजा यांचे चुलत बंधू, जरीफ यांच्याकडे नेहमी भेटायचे. हिंदू हा या सर्व अनर्थांचे मूळ असल्याची त्यांची भावना. इतर मुसलमानांप्रमाणे त्यांच्याही ती मनात घर करून बसली होती. ते काँग्रेसतर्फे दोनदा लोकसभेसाठी उभे राहिले होते. दोन्ही वेळी क्रांतिकारी समाजवादी पक्षाचे श्री. त्रिदीपकुमार चौधरी यांनी त्यांचा पराभव केला होता! बहुधा या अपयशाने ते खचून गेले होते. त्यांची आर्थिक परिस्थितीही चांगली नव्हती. एकदा बोलता बोलता ते म्हणाले, 'सत्तेच्या सौद्यात मुसलमानांना जे मिळवायचे ते मिळाले. त्यांचे अगदीच नुकसान झाले असेही नाही. पण त्यांचाच फायदा झाला असेही नव्हे.'

त्यांनी बोलावल्यावरून एकदा मी त्यांच्या घरी गेलो होतो. एक छोटे मुद्रणालय ते घरापाशीच चालवत. तेथे त्यांच्याकरता थांबलो. ते बऱ्याच वेळाने आले. त्यांचा चेहरा खिन्न दिसत होता! मला बसावे लागल्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. चहा मागवला. परंतु हे सारे करताना–बोलताना ते फार अस्वस्थ झाले होते. मग हळूहळू त्यांनी मन खुले केले. म्हणाले, 'मी सध्या आर्थिक हालाखीत आहे. अगदी कंटाळून गेलो आहे. एकदा वाटते, पाकिस्तानात निघून जावे!'

मी विचारले, 'पाकिस्तानात कोण आहे तुमचे?'

'नातेवाईक आहेत. मुलगी आहे – जावई आहे.'

'जावई काय करतो?'

'सध्या तुरुंगात आहे!'

'कशाकरता?'

'तो मुजिबुर रहमानच्या स्वायत्ततेच्या चळवळीत सामील झाला आहे.'

'मग तुम्ही जाऊन काय करणार?'

'या आर्थिक अडचणीतून तर मुक्तता होईल!'

'मग का जात नाही?' मी विचारले.

ते माझ्याकडे आश्चर्याने पाहात राहिले. मी त्यांना म्हणालो, 'मी खरेच हे गंभीरपणे तुम्हाला विचारतो आहे. तुमची थट्टा करीत नाही. पाकिस्तान-विषयी तुम्हाला वाटत असलेली आत्मीयता तुम्ही माझ्यापाशी बोलताना लपवून ठेवलेली नाही. तुमच्या मानसिक प्रकृतीला तिथे राहणेच अधिक योग्य ठरेल. तसे करणे प्रामाणिकपणाचेही ठरेल.'

ते काही क्षण स्तब्ध राहिले. काही तरी त्यांना बोलायचे होते. आणि ते बोलणे अडचणीचे वाटत होते. परंतु त्यांनी अखेर मनाचा हिय्या केला. ते म्हणाले, 'मी गेलोही असतो, परंतु गेल्यानंतर माझ्या जिल्ह्यातील मुसलमानांचे काय होईल, याची मला कल्पनाच करवत नाही. मुर्शिदाबाद जिल्ह्यात तुम्ही गेला आहात? जरूर जा. मुसलमानांच्या दुर्दशेची, दारिद्र्याची तिथे तुम्हाला कल्पना येईल. ते अतिशय लाचार आहेत. अधिकच लाचार बनत आहेत. अहो, आठ आण्यांसाठी ते हिंदूदेखील होतील!'

त्यांच्या या बोलण्याची मला फार गंमत वाटली. ते स्वतःच असहाय, अगतिक बनले होते आणि आपण आपल्या जिल्ह्यातील मुसलमानांना अगतिकते-पासून वाचवू असाही (गैर) समज त्यांनी आपल्या उराशी बाळगला होता!

मी त्यांना म्हणालो, 'मी काही बोललो तर वाईट वाटून घेऊ नका, पण मुसलमान राहिले तर तुमच्यावाचूनही राहतील – आणि ते नामशेषच होणार असतील तर तुम्हीदेखील त्यांना वाचवू शकणार नाही!'

माझे बोलणे त्यांनी लावून घेतले नाही. त्यानंतर मला एकदा जरीफ यांच्याकडे भेटले तेव्हा या हिंदू–मुस्लिम प्रश्नाबाबत अधिक माहिती हवी असल्याचे बोलले. 'तुम्ही या प्रश्नाचा विचार करताहात. मला काही पुस्तके वगैरे सुचवा; मी ती वाचून काढीन.' असे त्यांनी मला सांगितले.

मी त्यांना काही पुस्तकांची नावे सुचवली.

त्यांनी ती पुस्तके वाचली असतीलच असे म्हणणे अवघड आहे. वाचली असल्यास त्यांच्या विचारात काही बदल होईल की काय, हे सांगणे तर त्याहूनही अवघड आहे. ते ज्या प्रवाहात वाहात आहेत, त्यातून त्यांची मुक्तता होण्याची शक्यता मला तरी वाटत नाही.

× × ×

. ४ .

# ग्रँड हॉटेलातील कार्यक्रम

हिरालाल चोप्रांनी मात्र मला एकदा फार अडचणीत टाकले. कालीघाट लायन्स क्लबतर्फे त्यांनी ग्रँड हॉटेलात हिंदू–मुस्लिम प्रश्नांवर व्याख्यान ठरवले. या कार्यक्रमाला मान्यता देताना मला इंग्रजीतून बोलावे लागणार नाही आणि विशिष्ट वेश करावा लागणार नाही, असा खुलासा मी त्यांच्याकडून करून घेतला होता. परंतु दोन्ही बाबतींत ऐन वेळी मी अडचणीत आलो.

कार्यक्रमाला व्यापारी, उद्योगपती आणि सरकारी नोकर अशी साठ-सत्तर माणसे उपस्थित होती. मी इंग्रजींतून बोलावे अशी प्रा. चोप्रांनी मला ऐन वेळी विनंती केली. मला इंग्रजी बोलता येत नाही, हे मी त्यांना सांगितले. ' तुम्हाला जमेल तसे बोला ' असे म्हणून त्यांनी मला गप्प बसवले. परंतु त्यांनी ओळख करून दिल्यानंतर मी प्रारंभीच्या इंग्रजी भाषणात माझी हीच अडचण मांडली. ' आपल्याला माझे वाईट इंग्रजी ऐकावे लागणार आहे ' असे मी म्हणताच ' आपण दुसऱ्या कोणत्या भाषेत बोलू शकाल ? ' असे श्रोत्यांपैकी काहींनी विचारले. ' मी हिंदीतून बोलू शकतो ' हे सांगितल्यानंतर त्यांनी हिंदीतून बोलायला आपली अनुमती दर्शवली. अशा रीतीने एका अडचणीतून मी मार्ग काढला.

❦

भाषणानंतर मला श्रोत्यांनी काही प्रश्न विचारले. ' आपण मुस्लिम सामाजिक सुधारणांचा आग्रह का धरता ? धर्माच्या कायद्याचे हिंदू-मुसलमानांच्या परस्पर संबंधांशी नाते काय ? '

हा प्रश्न विचारणारे गृहस्थ मुसलमान आहेत, हे मी ओळखले.

मी त्यांना विचारले, ' हिंदू सामाजिक कायदे पूर्वीसारखेच राहिले तर तुम्ही आक्षेप घेणार नाही ? हिंदूंनी अस्पृश्यता पाळली, मुसलमानांबरोबर न खाण्याचे निर्बंध पाळले तर तुम्हाला आवडेल ? '

ते निरुत्तर झाले !

मी त्यांना म्हणालो, ' माझ्या या प्रश्नाला आपण जे उत्तर द्याल तेच आपल्या आधीच्या प्रश्नाला माझे उत्तर असेल.'

कार्यक्रम संपवून आम्ही डायनिंग हॉलमध्ये गेलो. तेव्हा हॉलच्या प्रवेश-द्वारापाशीच बेअररने मला अडवले ! माझा वेश तेथील नियमात बसणारा नव्हता हे उघडच होते. बुशकोट आणि पँट या वेशात मी गेलो होतो.

मी प्रा. चोप्रांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. त्यांचीही अवस्था अवघडल्या-सारखी झाली होती. येथे असे काही निर्बंध आहेत याची त्यांना कल्पना नव्हती. किंबहुना असे काही निर्बंध नाहीत असे त्यांनी गृहीत धरले होते. या प्रकाराविषयीची नापसंती दोन पंजाबी गृहस्थांच्या लक्षात आली.

त्यांनी अजीजीच्या सुरात म्हटले, ' आपण आमचे पाहुणे आहात. आपला अपमान होतो आहे, परंतु आम्हालाही कोट घालावा लागतोच, याची कल्पना नव्हती. आपल्याला आम्ही कोट देतो. आपण तो घालावा अशी आमची आपल्याला विनंती आहे.'

मी नकार दिला. ' पाश्चात्य पद्धतीचा कोट मी घालणार नाही.' मी त्यांना निक्षून सांगितले, ' विशिष्ट पद्धतीचा वेश असलाच पाहिजे, असा आग्रह असेल तर आपण जोधपुरी कोट आणून द्या. मी तो घालतो. तो घालून आत जाता येत नसेल तर मी घरी परतणेच पसंत करीन ! '

मग जोधपुरी कोट घालून आत जाता येते की नाही, हे विचारायला ते गृहस्थ आत गेले. या बाबतीत देखील त्यांना बरेच प्रयास पडले असावेत, कारण बाहेर परतायला त्यांना पंधरा मिनिटे लागली ! परंतु ते परतले मात्र आनंदाने.

' चला, तुम्ही जोधपुरी कोट घाला. ' त्यांनी लागलीच कुठून तरी जोधपुरी कोट पैदाही केला आणि तो घालून आम्ही आत गेलो.

या प्रकाराने मी अतिशय उद्विग्न झालो आणि ग्रँड हॉटेलच्या डायनिंग हॉलमधील पाश्चात्य संगीताच्या कार्यक्रमासहित असलेल्या त्या भोजनाचा मनापासून आस्वाद घेऊ शकलो नाही ! तथापि त्या पंजाबी गृहस्थांची माझ्या-बरोबर जवळीक निर्माण झाली. त्यांनी मद्य घेतले आणि मी घ्यावे, असा आग्रह धरला. मी नकार दिला तेव्हा त्यांनी ' आपण फारसे नैतिक बनू नका ' असा

मला सल्ला दिला ! मी मद्य घेत नाही या गोष्टीवर विश्वास ठेवायचेच त्यांनी नाकारले. अखेर त्यांच्या आग्रहास्तव थोडी बियर घेतली.

मला महाराष्ट्रभवनमध्ये त्यांनी आपल्या कारमधून पोचवले. कार महाराष्ट्र भवनपाशी उभी करून ते माझ्याशी बोलू लागले आणि अधिक मनमोकळे बनले.

' दंगलीत मी पोळून निघालो आहे.' ते मला म्हणाले, ' आणि मुसलमानांचा मनसोक्त द्वेषही केला आहे. पण तुम्हाला सांगू ? खैरुन्निसा नावाची एक मुलगी लाहोरला आमच्या शेजारी राहात होती. मी अजूनही लाहोरला जातो तेव्हा तिच्याकडे उतरतो आणि परत येतो तेव्हा हे भांडण कशाकरता आहे हे माझे मलाच कळेनासे होते ! '

आपल्या लाहोरच्या जुन्या आठवणींत ते दंग झाले. सुप्रसिद्ध समाजवादी नेते मुन्शी अहमद दीन यांनी एकदा आपल्याकडे झटका मटण कसे खाल्ले, हे त्यांनी मला सांगितले. माझ्या आईने पुन्हा पुन्हा त्यांना सांगितले की मटण हलाल केलेले नाही. पण त्यांनी ऐकले नाही. ' मला भूक लागली आहे ' असे म्हणून त्यांनी आम्ही वाढलेले मटण खाल्ले !

मुन्शी अहमद दीन नुकतेच दिल्लीला निधन पावले. पंजाबच्या भयानक हत्याकांडाने ते हादरून गेले. भग्न मनःस्थितीत त्यांनी आयुष्याची अखेरची वर्षे व्यतीत केली. हे मला तेव्हा आठवल्याखेरीज राहिले नाही.

कलकत्त्याला आल्यानंतर दोनतीन दिवसांतच आपल्या ओळखीचे एक पत्रकार असल्याची आठवण मला झाली. पन्नालाल दासगुप्ता हे त्यांचे नाव. ' कॅम्पस ' या नावाचे एक बंगाली साप्ताहिक ते चालवतात. मला ते ऐन युद्धाच्या काळात काश्मीरला भेटले होते. आम्ही बरोबरच हाजीपीरला गेलो होतो आणि दोघेही बरोबरच दिल्लीला परतलो होतो.

दासगुप्तांची आठवण केवळ या एवढ्या सहवासापुरती मर्यादित नव्हती. दि. ४ सप्टेंबर १९६५ ला आम्ही श्रीनगरहून जम्मूला आलो. दि. ५ रोजी तेथून पठाणकोटकडे यायला निघालो. सकाळीच जम्मूवर पाकिस्तानी टेहळणी

विमान घिरट्या घालून गेले. त्याला हुसकावून लावण्यासाठी खालून विमान-विरोधी तोफा डागण्यात आल्या. जम्मूच्या टूरिस्ट हाउस-मधील त्या वेळची धावपळ मी आणि दासगुप्तांनी एकत्रच अनुभवली. त्यानंतर आमची बस पठाणकोटकडे येत असताना समोरून येणारी सैन्याची आणि रणगाड्यांची रसद आणि आमच्या दिशेने पठाणकोटकडे चाललेली मुले, बायकामाणसे, आणि हाती लागेल ते सामान घेऊन निघालेली आम्ही पाहिली. त्या दिवशी निदान २५ हजार माणसांनी जम्मू सोडले. जीव घेऊन पठाणकोटकडे धाव मारणाऱ्या त्या माणसांकडे पाहून, एकदा रस्त्यात बस थांबली असताना दासगुप्ता मला म्हणाले, 'दलवाई, सी हाउ दीज चिकन-हार्टेड इंडियन्स आर फ्लाइंग – हे चिमणीच्या हृदयाचे लोक कसे जीव घेऊन पळताहेत पाहा.'

मी म्हणालो, 'तुम्हाला रणवीरसिंगपुरा येथील तोफांचे आवाज ऐकू येतात की नाही? येथून ही जागा केवळ आठ मैलांवर आहे. आणि काल छांबमध्ये पाकिस्तानी सैन्याने मनवर तावी नदी ओलांडल्याचे वृत्त आहे. त्या सैन्याला अडवायला मध्ये कोणताही नैसर्गिक अडसर आता उरलेला नाही. अशा परिस्थितीत लोकांनी काय करावे असे तुमचे म्हणणे आहे?'

'डॅम नॉन्सेन्स, शत्रूचे सैन्य आले म्हणून काय पळून जायचे? असे पळून आम्ही आमचे संरक्षण कसले करणार?'

त्यांच्या डोळ्यांत मला निखारे पेटलेले दिसले! ते निखारे एका जुन्या क्रांतिकारकाच्या प्रखर क्रांतिकारी निष्ठेचे होते, हे मला कलकत्त्यात त्यांना पुन्हा भेटल्यानंतर कळून आले.

पन्नालाल दासगुप्ता एक जुने क्रांतिकारक आहेत. त्यांना सारा बंगाल ओळखतो. पूर्व पाकिस्तानात तर त्यांच्या नावाचा अधिक बोलबाला आहे. त्यांच्या 'कॅम्पस' साप्ताहिकावर पूर्व पाकच्या सरकारने नुकतीच बंदी घातली आहे.

कॉलेज रोडवरील त्यांचे घर शोधीत मी गेलो. आणि त्यांच्यापुढे उभा राहिलो. तेव्हा त्यांनी तात्काळ ओळखले. 'यू आर् दलवाई!' त्यांनी विचारले, 'केव्हा आलात?'

मी त्यांना माझ्या कामाची माहिती दिली. त्या दिवशी संध्याकाळी मला त्यांनी पुन्हा बोलावले– आणि आपल्या वर्तुळातील बऱ्याच व्यक्तींची ओळख करून दिली.

'कॅम्पस' साप्ताहिकाचा विशिष्ट परिवार होता, असे म्हणायला हरकत नाही. जुने क्रान्तिकारक विविध राजकीय पक्षांची मंडळी, प्राध्यापक, विचारवंत अशा अनेकांचा तो मेळावा होता. प्रा. भट्टाचार्य, श्री. अमिताव्ह गुप्ता या मित्रांचा आणि माझा पुढे चांगला परिचय झाला. अंदमानला असलेले एक जुने क्रांतिकारकदेखील भेटले. 'कॅम्पस' साप्ताहिकाने चालवलेल्या कार्याची प्रा. दासगुप्तांनी मला माहिती दिली. पूर्व पाकच्या दंग्यांची माहिती काढायला दासगुप्तांनीच नलीन सरकारना गुप्तपणे डाक्याला पाठवले होते. त्यांनी आल्यानंतर लिहिलेल्या पुस्तकात बरीचशी नवी माहिती प्रकाशात आली होती. त्या पुस्तकाने बंगालच्या राजकीय क्षेत्रात तेव्हा बरीच खळबळ माजली होती.

श्री. पन्नालाल दासगुप्तांच्या परिवारातील मंडळींची या प्रश्नावरील भूमिका मला बरीचशी स्वप्नाळू भासली. अजूनही ते दोन्ही बंगालचे ऐक्य होईल, असे मानतात! त्यातील अमिताव्ह गुप्ता मला अधिक स्वप्नाळू वाटले. ते अजूनही तथाकथित हिंदू–मुस्लिम ऐक्याच्या जुन्या आदर्शवादी कल्पनांना चिकटून आहेत, असा माझा समज झाला. प्रा. भट्टाचार्य यांची भूमिका सैद्धान्तिक बनली होती. साऱ्या धार्मिक आणि सामाजिक संघर्षांना मार्क्सवादी सिद्धांताच्या पठडीत कोंबण्याच्या हव्यास त्यांना आवरत नव्हता!

स्वतः पन्नालाल मात्र अधिक व्हवहारवादी आहेत. त्यांचे मन अद्याप ताजेतवाने आहे. आपल्या जुन्या मतांना चिकटून राहाण्याची प्रवृत्ती त्यांच्यात नाही. कलकत्त्याला त्यांनी पूर्व पाकिस्तानातील नियतकालिके आणि प्रकाशने यांचे मे महिन्यात भरविलेले प्रदर्शन, ही त्यांच्या निकोप मनाची साक्ष म्हणता येईल. नेहरूंच्या मृत्यूनंतर वेगवेगळ्या वृत्तपत्रांनी व्यक्त केलेल्या केवळ प्रतिक्रियांतून पूर्व पाकिस्तानची आजची मनोवृत्ती कळून येऊ शकली. या प्रदर्शनात राजशाही विद्यापीठातील एका प्राध्यापकांनी लिहिलेले 'पूर्व पाकिस्तानातील जातीयवाद' हे पुस्तक देखील ठेवण्यात आले होते! पूर्व पाकिस्तानातील जातीयवादाचे विश्लेषण करणारी पुस्तके येऊ लागली आहेत, ही अनेकांच्या मते तेथील स्वागतार्ह अशा बदलत्या मनःस्थितीची खूण आहे.

पूर्व पाकिस्तानात बदल येऊ घातला असल्याचा समज बहुतेक साऱ्याच सुशिक्षित, बुद्धिजीवी वर्गात मला आढळला. श्रीमती मैत्रेयीदेवींनी तर या

बाबतीत एक विशिष्ट कार्य चालवले आहे. त्या काढीत असलेल्या एका नियतकालिकाचे शेकडो अंक पूर्व पाकिस्तानात वाचले जातात. त्यांना असंख्य वाचकांची पत्रे येतात. त्यांनी तेथील अनेकांबरोबर संपर्क जोडला आहे आणि आपल्या अनुभवांवरून त्यांना कुठे तरी आशेचा किरण दिसतो आहे.

'क्वेस्ट' या द्विमासिकाचे संपादक श्री. अबू सईद अय्यूब आणि सौ. गौरी अय्यूब देखील, पूर्व पाकिस्तानातील या नव्या प्रवाहाने भारावलेली दिसली. याला अपवाद श्री. हसनुल रहमान यांचा. पन्नालालनी माझी या साऱ्यांशी भेट ठरवून दिली. रहमान यांच्याबद्दल सांगताना मात्र ते म्हणाले, 'तुम्ही जरा सावधतने त्यांच्याशी बोला. एका वेगळ्या अर्थाने तोही जातीयवादीच आहे. ही इज अँटी–मुस्लिम मुस्लिम. ते मुस्लिमविरोधी मुस्लिम आहेत !'

रहमान तेव्हा आजारी होते. आणि आपल्या बहिणीच्या इस्पितळात दाखल झाले होते. मी त्यांना दोनदा तेथे भेटलो. एकदा त्यांच्या घरीही गेलो. 'मला मुसलमानांत परिवर्तन होण्याची आशा वाटत नाही,' ते म्हणाले, 'परिवर्तनाला आवश्यक असलेली फ्लेक्झिब्लिटी – लवचिकता – या धर्मात नाही.' पूर्व पाकिस्तानात बदल होत असल्याचेच त्यांना अमान्य होते. 'दॅट इज ऑल नॉन्सेन्स – तो सारा बावळटपणा आहे –' ते म्हणाले, 'आमच्या लोकांचे हे वुइशफुल थिंकिंग – भोळसट आशावाद – आहे !'

बंगाली हिंदू बुद्धिजीवी वर्गाला रोमँटिक कल्पनांत गुंग होणे फार आवडते. पूर्व पाकिस्तानातील तथाकथित बदल हा कलकत्त्याच्या बुद्धिजीवी वर्गाच्या डोक्यातील खेळ आहे !

* * *

. ५ .

# हिंदू जातीयवादावर कडाडून हल्ला

अयूबना अ. भि. शहांनी पत्र दिले होते. त्यांना आणि मैत्रेयीदेवींना मी एका रविवारी दोन तासांच्या अंतराने भेटलो. दोघेही जवळ राहतात. आणि एकमेकांना चांगले परिचित आहेत. ' मैत्रेयीदेवींना आपण फोनवर कळवले आहे. तुम्ही त्यांची वेळ ठरवून भेटा ' असे पन्नालालनी मला सांगितले होते. त्यांना फोन केला व संध्याकाळी सहा वाजता अयूबना भेटणार असल्याचे सांगितले होते. तेव्हा त्यांनी चार वाजताची वेळ दिली. ' तुम्ही येथून अयूब यांच्याकडे जाऊ शकता. त्यांचे घर जवळच आहे. मी तुम्हांला पोचवायची व्यवस्था करीन ' असेही त्यांनी सांगितले. परंतु एक घोटाळा झालाच. माझे नाव मैत्रेयीदेवींनी नीट ऐकले तरी नसावे किंवा पन्नालालनी माझ्याविषयी पुरेशी माहिती त्यांना सांगितली नसावी. माझे स्वागत केल्यानंतर त्या म्हणाल्या, ' या प्रश्नावर तुम्हाला काय बोलायचे आहे ते आधी सांगा. मी माझे विचार मागाहून सांगेन ! '

मी थोडक्यात त्यांना माझे म्हणणे समजावून दिले. ' तुम्ही या विषयाचा अभ्यास करा, पण मला काय वाटते ते सांगते ' असे त्या म्हणाल्या. आणि मी हिंदू असल्याचे गृहीत धरून विलक्षण आवेशाने हिंदू जातीयवाद्यांवर तुटून पडल्या. त्यांच्या बोलण्यातील आग्रहीपणाने आणि एकांतिक भूमिकेने मी चकित झालो ! थोडा अस्वस्थही झालो !

एकदा त्यांना अडवण्याचा मी प्रयत्न केला. तेव्हा त्या चटकन म्हणाल्या, ' तुमचे मी ऐकून घेतले. आता मला बोलू द्या. तुम्हा पुरुषांना प्रत्येक वेळी अधिकार गाजवण्याची सवय लागली आहे.' आणि पुन्हा त्या पुढे बोलू

लागल्या. अखेर त्यांचे बोलणे झाले – आणि त्या बोलण्याच्या अनुषंगाने आमची चर्चा सुरू झाली. तेव्हा त्यांच्यात आणि माझ्यात काही समान विचारांचा धागा जोडला गेला असल्याचेही मला जाणवले.

हिंदुस्थानात प्रबोधनाचा आरंभ हिंदूंपुरता मर्यादित होता. मुसलमान त्यापासून अलग राहिले. त्यांच्यांत सुधारणा घडवून येण्याने या प्रश्नाची तीव्रता कमी होईल ' हा विचार त्यांनी मांडला.

' या दृष्टीने काय करता येईल ? ' मी त्यांना विचारले, ' तुम्ही स्टेट्समनमध्ये एक पत्र लिहून समान नागरी विधेयकाचा पुरस्कार केला आहे. या बाबतीत काही अधिक प्रयत्न करता येतील काय ? आपण काही मुस्लिम स्त्रियांबरोबर चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न कराल काय ? कारण हा प्रश्न समजून घेण्या-बरोबरच मी या बाबतीत काही करता येईल का याचेदेखील प्रयत्न चालवले आहेत.'

' हो, हो. जरूर करू. तुम्ही तुमचा पत्ता देऊन ठेवा. मी तुम्हाला दोन-तीन दिवसांत कळवते.' त्या म्हणाल्या. आणि मी त्यांना माझे नाव आणि महाराष्ट्रभवनचा पत्ता लिहून दिला. त्यांनी नाव वाचून विचारले, ' तुमच्या महाराष्ट्रात ही अशी नावे कशी ठेवतात ? '

झालेला घोटाळा माझ्या लक्षात आला. मी त्यांना म्हणालो, ' मी मुसलमान आहे. पन्नालालनी तुम्हाला नीट माहिती दिलेली दिसत नाही ! '

त्या आश्चर्यचकित होऊन म्हणाल्या, ' काय म्हणता काय ? मला याची कल्पना नाही. तुमच्या घाऱ्या डोळ्यांमुळे मी जरा सावध बनले. मला वाटले, तुम्ही पुण्याचे कोणी सावरकरवादी ब्राह्मण तरुण आहात ! आणि म्हणून मुस्लिम समाजाचे दोष तुम्हाला सांगणे मला प्रशस्त वाटले नाही. तुमच्या बोलण्यावरूनही तुम्ही मुसलमान आहात असे वाटले नाही. म्हणजे एखादा मुसलमान जसे झटकन आपल्या वागण्याचे समर्थन करतो तसे तुम्ही केले नाही आणि म्हणून माझा समज अधिक दृढ झाला. पण आता मला अधिक मोकळे आणि स्पष्ट बोलायला हरकत नाही.'

मग आधी जेवढ्या आवेशाने त्यांनी हिंदू जातीयवादाची चिरफाड केली, तेवढ्याच आवेशाने त्या मुस्लिम जातीयवाद्यांवर तुटून पडल्या ! त्या म्हणाल्या, ' पश्चिम बंगालचा मुसलमान अजूनही फाळणीपूर्व मनःस्थितीत वावरत आहे. थोडा बदल तरुण वर्गात आहे आणि स्त्रियांतही असावा. मी काही मंडळींशी तुमची भेट घालून देणारच आहे.'

अयूब यांचा तेवढ्यात तेथे माझी चौकशी करण्यासाठी फोन आला आणि आमचे बोलणे संपले. मी आलो आहे की नाही, हे त्यांनी विचारले. कारण सहा वाजून गेले होते ! मैत्रेयीदेवींनी बोलणे आवरते घेतले.

मी उठताना त्यांना म्हणालो, ' मला तुम्ही हिंदू समजल्यामुळे बिचाऱ्या हिंदूंची यथेच्छ नालस्ती करण्याचे एक मानसिक समाधान तुम्हांला आज लाभले ! '

त्यांना माझ्या बोलण्यातील खोच कळून आली.

' हिंदूंना तुम्ही उगीच बिचारे हे विशेषण लावू नका ! ते तसे बिचारे नाहीत. मुसलमानांएवढेच खट्याळ आहेत ! आता वेळ नाही. नाही तर तुम्हाला त्यांच्या खट्याळपणाच्या आणखी काही गोष्टी सांगितल्या असत्या ! '

❂

अयूब वाटच बघत होते. बंगाली व्यक्तित्वाचे मला त्यांच्या रूपाने दर्शन झाले. विशिष्ट बंगाली व्यक्तित्व आपल्या समोर उभे राहिले आहे असे मला जाणवले. धोतर आणि सदरा होताच, परंतु बोलण्याची लकबही बंगाली बुद्धिजीवी वर्गाचे प्रतिनिधित्व करीत होती.

तथापि ते स्वतः मात्र बंगाली नाहीत बिहारी आहेत, हे त्यांच्या बोलण्यातून मला कळले. गेली तीस–चाळीस वर्षे ते बंगालमध्ये राहात आहेत आणि बंगाली साहित्यांतही त्यांनी स्वतःचे एक विशिष्ट स्थान निर्माण केले आहे.

मी भेटलो तेव्हा सी. आय. ए. या अमेरिकन गुप्तहेर संघटनेच्या संबंधी बरेच वादळ माजले होते. आणि अयूबनी एक पत्र ' स्टेट्‌समन 'मध्ये लिहून आपली प्रतिक्रियाही व्यक्त केली होती. ते स्वतः ज्या कल्चरल कमिटीच्या ' क्वेस्ट ' या द्वैमासिकाचे संपादक आहेत त्या कमिटीने सी. आय्. ए. चा पैसा घेतल्याचा आरोप करण्यात आला होता. तथापि ते स्वतः त्या वादळातही मनाने स्वस्थच राहिले आहेत हे मला जाणवले.

❂

त्यानंतर मी त्यांना दोन-तीनदा तरी भेटलो. बंगालमधील बुद्धिजीवी वर्गातील ज्या काही हातांच्या बोटांवर मोजता येतील एवढ्या समतोल विचारांच्या व्यक्ती असतील, त्यांच्यांतील अयूब हे एक असावेत. बंगालच्या मुसलमानांतील खऱ्या अर्थाने एकमेव धर्मनिरपेक्ष आणि सखोल विचारवंत, असे त्यांचे वर्णन केले तर ते अतिशयोक्तीचे ठरू नये. तथापि १९६४ साली

उसळलेल्या जातीय दंगलीचा ओरखडा त्यांच्याही मनावर कुठे तरी उमटला गेला आहे; हेही मला जाणवले !

एकदा बोलताना ते मला म्हणाले, ' माझा मुस्लिम समाजाशी आता क्वचितच संबंध उरला आहे. माझी पत्नी हिंदू आहे. माझ्या मुलाचे नाव वैदिक नाव आहे. पण मला हिंदू देखील आपला मानायला तयार होणार नाहीत ! दंगली झाल्या तेव्हा माझ्यावरही स्थलांतर करायची वेळ येते की काय, असे मला वाटू लागले होते.'

त्यांच्या मनाची ही अवस्था अल्पकाळ टिकली, तरीही त्यांचा या प्रश्नावरील दृष्टिकोण तितकासा आशावादी राहिलेला नाही, असे मला वाटले !

पूर्व पाकिस्तानमधील बदलाविषयी त्यांनाही आशा वाटते. त्यांनी मला पूर्व पाकच्या एका वृत्तपत्रात माजलेल्या वादाचे उदाहरण सांगितले. एखाद्या मुस्लिम स्त्रीचे नाव काय असावे, यावर एका पूर्व पाकिस्तानी मुस्लिम विद्यार्थ्याने एका वृत्तपत्रात पत्र लिहून मतप्रदर्शन केले होते. ' जमीला ' असे नाव असले काय आणि ' विमला ' असले काय, फारसा काहीच फरक नाही, असे त्याने प्रतिपादन केले होते ! जमीला हे नाव अरबी आहे, इस्लामी नव्हे. कारण इस्लामी असे स्वतंत्र काहीच अस्तित्वात नाही ! अरबांनी पुढे इस्लामचा स्वीकार केला, पण त्यांची अरबी नावे काही बदलली नाहीत ! भारतीय मुस्लिमांनी देखील इस्लामचा स्वीकार केल्यामुळे आपली भारतीय नावे बदलून अरबी नावे लावण्याची काहीच आवश्यकता नाही, असे विचार त्याने व्यक्त केले होते !

या पत्रावर अर्थातच प्रचंड खडाजंगी माजली, तथापि पूर्व पाकिस्तानातील एक विद्यार्थी असे विचार व्यक्त करतो, ही फार महत्त्वाची बाब आहे. यापूर्वी असे विचार व्यक्त केले जात नव्हते, असे अयूबनी मला सांगितले.

एकदा अयूब यांच्याकडे मी जेवायला गेलो असताना सौ. गौरी अयूब यांनी ताटातील पदार्थाकडे बोट दाखवून म्हटले, ' हे गोमांस आहे. तुम्हाला हवे तर घ्या !'

मला गोमांस आवडत नाही, हे सांगून त्यांना पटले नाही ! अयूब यांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांनी बेताचाच आहार घेतला— आणि गोमांस त्या दिवशी सौ. अयूबनी खाल्ले.

आपल्या विवाहामुळे उठलेल्या वादळासंबंधी बोलताना त्या म्हणाल्या, ' अनेकदा आपण अनेक व्यक्तींना जी लेबले चिकटवली ती कितपत बरोबर

आहेत याचा विचार करावयाची वेळ आली आहे. माझे वडील बंगालचे प्रसिद्ध गांधीवादी. बिहारात पाटणा येथील सदाकत आश्रमातही ते काही काळ राहिले होते; परंतु माझ्या लग्नाला त्यांनी केवळ विरोधच केला असे नव्हे तर गेली बारा वर्षे त्यांनी माझ्याशी कोणताही संबंध ठेवलेला नाही !' अतिशय कडवटपणे त्या पुढे म्हणाल्या, 'गांधीवाद्यांसारखी दुसरी रूढिप्रिय माणसे तुम्हाला भारतात शोधून देखील सापडणार नाहीत !'

x x x

ग्रंथसंग्रहालय ठाणे
23433

**. ६ .**

# अजब आदरातिथ्याचा अनुभव

बंगालच्या खेड्यात आणि विशेषतः पूर्व पाकिस्तानच्या सीमेवर जायचे असेल तर खादी कमिशनच्या कलकत्त्याच्या कार्यालयाचे प्रमुख श्री. शैलेशकुमार बंदोपाध्याय उपयोगी पडतील, असे अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी मला सांगितले होते. ते बंदोपाध्यायना पत्रही लिहिणार होते. पण श्री. बंदोपाध्यायना भेटलो तोवर अण्णासाहेबांचे पत्र त्यांना मिळाले नव्हते. तथापि ‘ आपण अण्णासाहेबांकडून आला आहात, त्यामुळे पत्राची जरूरी नाही.’ असे म्हणून त्यांनी सीमेवर राहायची सोय करण्याचे कबूल केले.

दोन-तीन दिवसांनी त्यांना आण्णासाहेबांचे पत्र मिळाले. ‘ असल्या कामात मला खूप उत्साह वाटतो. अशी साहसे मीही केली आहेत ’ असे ते म्हणाले. सीमेवर ‘ बगुला ’ या छोट्या शहरात गांधीसेवा मंदिर चालविणारे, खादी कमिशनचे एक कुंडू नावाचे कार्यकर्ते होते. ते योगायोगाने कलकत्त्याच्या ऑफिसला आले होते. बंदोपाध्यायांनी माझी कुंडूंशी ओळख करून दिली आणि माझ्या कामाचे स्वरूप त्यांना समजावून दिले. कुंडूंनी लागलीच दिवस ठरवला आणि सकाळच्या एका विशिष्ट गाडीने यावयास सांगितले.

सीमेवर जाण्यापूर्वी मी ताराशंकर बॅनर्जी आणि अन्नदाशंकर रॉय यांना भेटावे, असे बंदोपाध्यायांनी मला सुचवले. ताराशंकर बॅनर्जींचे नाव ऐकले होते, तेव्हा त्यांना ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले होते. अन्नदाशंकर रॉय यांची

मला फारशी माहिती नव्हती. ते बंगालमधील तत्त्वचिंतक, लेखक असल्याचे ऐकले होते.

ताराशंकर बॅनर्जी आणि अन्नदाशंकर रॉय या दोघांनाही मी भेटलो. ताराशंकरांनी मला ‘ मोकळेपणाने प्रश्न विचारा ’ असे सांगितले.

पूर्व पाकिस्तानच्या स्वायत्ततेच्या चळवळीविषयी मी त्यांना एक प्रश्न विचारला, परंतु त्यांना तो नीट कळला नाही आणि पश्चिम बंगालच्या सार्वभौमत्वाविषयी मी विचारीत आहे असे वाटून ते चटकन उद्गारले, ‘ छेः ! छेः ! पश्चिम बंगाल आणि स्वतंत्र ? ही कल्पनाच करता येत नाही ! काही तरुण मंडळी तसा विचार करतात हे खरे आहे. भविष्यात काय लिहिले आहे हे सांगता येत नाही, परंतु बंगाल स्वतंत्र झाल्यावर आम्ही काशीला कसे जाऊ ? हरिद्वार, हृषिकेशची यात्रा कशी करता येईल ? छेः ! छेः ! आमच्या या पुण्यक्षेत्रांपासून वंचित होण्याची कल्पनाच मला सहन होत नाही ! ’

ताराशंकर बॅनर्जींनी साठी ओलांडली आहे. जुन्या आणि नव्या जगाच्या संगमावर ते उभे आहेत. येणाऱ्या नव्या काळाची चाहूल त्यांना लागली आहे त्याने ते भांबावले आहेत. परंतु त्यांचे मन मात्र जुन्या काळात गुंतून पडले आहे, हे त्यांच्याशी बोलल्यानंतर मला जाणवले.

अन्नदाशंकर रॉयना भेटल्याने बऱ्याच गोष्टी शिकलो. मन किती तर्कशुद्ध असू शकते याचा मला त्या दिवशी प्रत्यय आला. ‘ बंगालचे सर्वांत अधिक तर्कशुद्ध आणि उदारमतवादी विचारवंत ’ असा मी त्यांचा उल्लेख करणे अतिशयोक्त ठरणार नाही.

१९०५ ची वंगभंगाची चळवळ आणि तेव्हापासून १९४७ पर्यंतच्या बंगालमधील हिंदू–मुस्लिम संबंधांच्या वाढत्या दुराव्याचा एक शास्त्रीय आलेखच त्यांनी आपल्या बोलण्यातून माझ्यापुढे रेखाटला ! ते जुने आय्. सी. एस. अधिकारी. त्या निमित्ताने बंगालच्या राजकीय प्रवाहांचे त्यांनी अतिशय जवळून निरीक्षण केलेले. दंगली, अमानुष कत्तली आणि एरवीचे शांत ग्रामीण ‘जीवन, ही समाजजीवनातील दोन आत्यंतिक स्थित्यंतरे त्यांनी अजमावलेली आणि तरीही त्यांची दृष्टी आणि मन ढगाळले नाही.

तथापि मागाहून निरोप घेताना त्यांनी शिवसेनेचा उल्लेख करून म्हटले,

'मुंबई महाराष्ट्राला देण्यात चूक आहे असे मला तेव्हाच वाटत होते. आता त्याचा प्रत्यय येतो आहे!'

मी त्यांना सांगितले, 'माफ करा. तुमच्या या मताशी मी सहमत होऊ शकत नाही. शिवसेनेच्या चळवळीचे मला समर्थन करायचे नाही, तथापि बंगालमधील मुसलमानांच्या आंदोलनाकडे जितक्या सहृदयतेने आपण पाहू शकता तितक्या सहृदयतेने महाराष्ट्रीयांची बाजू आपण ऐकून घेतली पाहिजे असे मला वाटते. शिवसेनेच्या चळवळीवरून अवघ्या मराठी मनाचे आपण निदान करणे ठीक नाही.'

ते हसले आणि मग त्यांना मी जे काही सांगितले ते उभ्या उभ्या ऐकून घेतल्यानंतर ते म्हणाले, 'हे मला माहीत नव्हते. तुमचे म्हणणेही बरोबर आहे. हे सारे स्थित्यंतराचे तणाव आहेत. ते काही काल जाणवणारच!'

आणि मग एका शनिवारी सकाळी मी स्थालदा स्टेशनवरून एका गाडीने सीमेवरील बगुला या स्टेशनवर उतरलो. कुंडू स्टेशनवर आले होते. मला गांधी सेवा मंदिरात घेऊन गेले. तेथे एक प्रौढ बाई होत्या. त्या, त्यांची दोन मुले आणि कुंडू, असा परिवार तेथे राहात होता. या बाई हिंदी चांगले बोलत होत्या.

'बाबा यँहा आया था!' असे त्या एकदा म्हणाल्या. त्या अशा एकेरी नावाने कुणाचा उल्लेख करीत आहेत, हे आधी माझ्या लक्षात आले नाही. परंतु मागाहून विचारले, तेव्हा त्या विनोबांना उद्देशून म्हणत असल्याचे कळले! त्या विनोबाजींबरोबर काही काळ पदयात्रेत होत्या.

भाषेची अडचण प्रथमच मला तेथे प्रकर्षाने जाणवली. कुंडूंना जेमतेम हिंदी येत होते, हिंदी एरवी कुणालाच येत नव्हते! इंग्रजी जाणणारेही खेड्यात फार थोडे. एक शेजारचे कम्युनिस्ट शिक्षक येऊन बसले. कुंडूंनी माझी त्यांच्याशी ओळख करून दिली, परंतु त्यांच्याशी बोलतानाही भाषेचा प्रश्न उभा राहिला! त्यांना बंगालीखेरीज दुसरी कोणतीही भाषा येत नव्हती. अखेर कुंडूंच्या साहाय्याने मला त्यांच्याशी बोलावे लागले.

पुढील दोन दिवसांत कुंडूंनी दुभाष्याचे काम केले म्हणून मला तेथे वास्तव्य करणे शक्य झाले. दोन दिवसांचा कार्यक्रम त्यांनी ठरवला होता. गेलो त्या दिवशी दुपारी पखुरिया गावाला भेट द्यायची होती. दुसऱ्या दिवशी सकाळी अगदी सीमेवर असलेल्या लखुटिया गावात जायचे होते.

मे महिन्यातील प्रखर ऊन आणि हवेतील भयंकर आर्द्रता यामुळे हे दोन दिवस अतिशय त्रासाचे गेले. सबंध शरीर घामाने डबडबून जाई. पहिल्या दिवशी पखुरिया गावात बसने गेलो. बंगुलापासून सुमारे सात मैलांवर हा गाव आहे. लखुटिया त्याच्याही पुढे सात मैलांवर, आड रस्त्याला.

पखुरिया गावातील काही मंडळी कुंडूंच्या ओळखीची होती. येथील मुसलमान वस्तीत आम्ही गेलो. गावात प्रामुख्याने मुसलमानांची वस्ती आहे. आम्ही पोचेपर्यंत संध्याकाळ झाली होती. गावापासून सुमारे सात मैलांवर सीमा आहे, हे कळताच आम्ही प्रथम शेतांतून सीमेवर नदीच्या काठी गेलो. एकजण नदीत मासे पकडीत होता. नदी किरकोळच आहे. ‘ इच्छामती ’ असे या नदीचे नाव आहे. हा मनुष्य पखुरिया गावातील होता.

‘ तुझे नाव काय ? ’ कुंडूंनी त्याला विचारले.

‘ असलमजा ! ’

मग कुंडूंनी अधिक माहिती विचारल्यावरून त्याने सांगितले की, ‘ मासे पकडताना कोणी त्रास देत नाही. भारतीय सीमारक्षक सतावत नाहीत. मात्र पाकिस्तानी सीमारक्षक थोडे मासे मागून नेतात.’

काळोख पडायला लागल्यामुळे आम्ही तेथे फार वेळ थांबलो नाही. समोरच्या पाकिस्तानी प्रदेशात एक–दोन घरे दिसत होती, परंतु तेथे काहीच हालचाल जाणवली नाही. सीमारक्षकांचाही कुठे पत्ता नव्हता !

‘ जवळच त्यांची चौकी आहे. आपण तेथे जाऊ या,’ असे कुंडूंनी मला सुचवले. तथापि काळोख पडल्यामुळे आम्ही तेथे जायचे रद्द करून पखुरिया गावात आलो.

ज्या मुसलमान गृहस्थांना कुंडूंनी निरोप पाठवला होता, त्यांची गाय मेली होती. त्यामुळे ते फारसे उत्साही नव्हते. हिंदी किंवा उर्दूही कुणाला बोलता येत नव्हते. आम्ही गेलो व त्या गृहस्थांच्या घरापाशी असलेल्या एका मोकळ्या जागेतील सोडून ठेवलेल्या बैलगाडीच्या जूवर बसलो.

आम्हांला पाहताच आणखी काही मंडळी आली. कंदील आणण्यात आले. गावच्या मुल्लाजीलाही पाचारण करण्यात आले; कारण त्यांना उर्दू अवगत होते.

भयानक दारिद्र्याचे या वस्तीत दर्शन घडले. स्त्रिया अधूनमधून बाहेर वावरत होत्या. त्यांच्या अंगावरील वस्त्रे फाटकी होती. त्यांना काही वेगळे अस्तित्व आहे, असे वाटतच नव्हते ! तरुण मुले त्या मानाने अधिक तरतरीत भासली. ती मोकळेपणाने बोलत होती. विचारलेल्या प्रश्नांना मोकळेपणाने उत्तरे देत होती.

'गावात मुसलमान वस्ती किती ?' मी कुंडूंच्या मदतीने प्रश्न विचारला.

'शंभर घरे- सुमारे पाचसहाशे माणसे !'

'पाकिस्तानात किती गेली ?'

'आम्ही सर्वच गेलो होतो पन्नासमधील दंगलीत. पुन्हा परत आलो !'

प्रत्येक दंगलीच्या वेळी सीमेवरील माणसे दुसऱ्या सुरक्षित वाटणाऱ्या हद्दीत आश्रय घेतात -- आणि मागाहून शांतता प्रस्थापित झाली की परत येतात ! कधी त्यांची घरे दुसऱ्यांनी व्यापलेली असतात, कधी सरकार त्यांना ती पुन्हा मिळवून देते. प्रत्येक दंगलीत पूर्व पाकमधून हिंदू निर्वासितांची एक लाट येऊन आदळते ! त्यातील बरेचसे परत जायचे नाकारतात.

गावातील एक मुसलमान मुलगा कॉलेजात शिकत आहे. एकही मुसलमान मुलगी प्राथमिक शाळेत नाही, दुय्यम शिक्षणाची पायरी चढलेली नाही. सुमारे चौदा-पंधराव्या वर्षी मुलींची लग्ने होतात. गावात मदरसा आहे. त्यात २०० मुले शिकतात !

'मदरशात कोणते विषय शिकवतात ?'

'अरेबिक, पर्शियन आणि इतिहास-भूगोल'

'मदरशातील किती मुले पुढे शालेय शिक्षण घेतात ?'

'फार थोडी.'

'मौलवी किती होतात ?'

'गेल्या आठ वर्षांत चारजण मौलवी झाले आहेत !'

'बाकीचे काय करतात ?'

'मध्येच शिक्षण सोडतात.'

'एवढ्या मुलांना आपण शाळेत न पाठवता मदरशात कशाला पाठवता ? सगळ्यांनी मौलवी होऊन काय करायचे आहे ?'

'धार्मिक शिक्षण मुलांना असले पाहिजे, म्हणून पाठवतो.'

'पण त्यांचे शालेय शिक्षणाचे नुकसान होते त्याचे काय ?'

या प्रश्नाला कुणी उत्तर दिले नाही !

'गेल्या निवडणुकीत आपण मते कुणाला दिलीत ?'

'जहांगीर कबीर इथे आले होते. त्यांनी सांगितलेल्या पक्षाला दिली. काहींनी कॉंग्रेसला दिली.'

‘ येथे तुम्हांला काही त्रास होतो काय ? ’

‘ पाकिस्तानातून आलेले निर्वासित आमचे पीक कापतात. पोलिसात तक्रार करून काही उपयोग होत नाही. पोलीस दोन दिवस येऊन उभे राहतात, आणि निघून जातात, दाद घेत नाहीत. ’

●

सुमारे दोन तास आमचे हे बोलणे चालले होते. या अवधीत कुणीही आम्हांला आपल्या घरी बोलावले नाही. किंवा पाहुणचारादाखल एक कप चहादेखील दिला नाही या गोष्टीचे मला अतिशय आश्चर्य वाटले ! असा अनुभव मला पूर्वी कधी आला नव्हता. अनेक मुस्लिम गृहस्थांनी माझ्याशी माझ्या विचारांबद्दल तावातावाने भांडण केले आहे, परंतु त्याचबरोबर मला आग्रहाने घरी पाहुणचार केल्याखेरीज परत पाठवले नाही !

रात्रीचे नऊ वाजले होते– आणि शेवटची बसही निघून गेली होती. बगुला तेथून सहासात मैलांवर होते आणि तेवढे अंतर चालत जाण्याखेरीज आमच्यापुढे गत्यंतर नव्हते. तथापि आम्हांला कुणी औपचारिक देखील ‘ एवढ्या रात्री इतके लांब जाऊ नका ’ असे म्हणाले नाही ! नाही म्हणायला बगुलाच्या कॉलेजात जाणारा गावातील एकुलता एक मुलगा कंदील घेऊन आम्हांला पोचवायला आला ! तथापि रस्त्यावर आल्यानंतर आम्ही त्याला परत पाठवून दिले; आणि सावकाश चालू लागलो. दोनतीन मैल चालून झाल्यावर योगायोगाने एक सायकल रिक्षावाला भेटला. त्याने बगुलापर्यंत आणून सोडले. तेव्हा बारा वाजून गेले होते !

× × ×

. ७ .

# पूर्व पाकच्या सीमेवर

दुसऱ्या दिवशी सकाळी पाच वाजता सायकलवरून लखुटिया गावाकडे जायला निघालो. साडेचार वाजताच उजाडले होते. पाच–सव्वापाच वाजताच ऊन पसरू लागले आणि उन्हाचा ताप वाढला.

कालच्या गावापर्यंत आलो. रात्री कंदील घेऊन पोचवायला आलेला तो मुलगा रस्त्यात उभा होता. त्याने थांबवून आम्हांला घरी बोलावले. परंतु ' आम्हांला पुढे जायचे आहे, ' असे त्याला सांगितले.

तेथून आडमार्ग सुरू झाला आणि पाच-सहा मैलांची रपेट केल्यानंतर इच्छामती नदीच्या काठांवरच असलेला गाव लागला. गावाच्या बाहेर सरकार नावाच्या एका गृहस्थांकडे थोडा वेळ थांबलो.

कुंडू या गावात मागे अंबर चरख्याचे केंद्र चालवीत होते. त्यामुळे त्यांना सारे लोक ओळखीत होते. सरकार वैद्यकीय व्यवसाय करतात. ते चित्तगाव जिल्ह्यातील. चित्तगाव बॉम्ब-प्रकरणात त्यांनी एके काळी भाग घेतला होता आणि दीर्घ कारावास भोगला होता. दंगलीनंतर ते भारतीय बंगालमध्ये आले.

मी कशाकरता आलो आहे, याची कल्पना दिल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडे बसलेल्या एका मुसलमान गृहस्थांची ओळख करून दिली. मग गावातील दोन मौलवींना बोलावले.

त्यातील एक देवबंद येथे शिकून आले होते. त्यांना उर्दू चांगले येत होते. मी सरकारना काही प्रश्न विचारले.

पूर्व पाकिस्तानातील १९४६ च्या दंगलीविषयी त्यांनी बरीचशी माहिती पुरवली. मग गावाविषयी विचारायला सुरुवात केली.

‘ आपल्या गावात आंतरजातीय लग्ने झाली आहेत का ? ’ असा प्रश्न मी विचारला. तेव्हा सरकार एकदम उत्तरले, ‘ आंतरजातीय काय, येथे आंतर-धर्मीय लग्नही झाले आहे ! ’

परंतु त्या मौलानाने मध्येच म्हटले, ‘ ते, ते विचारीत नाहीत. हिंदूंच्यांत आपसांत लग्ने होतात का, हे विचारीत आहेत.’

हे आंतरधर्मीय लग्नाचे प्रकरण मला कळू नये, ही त्या मौलानांची चाललेली धडपड माझ्या लक्षात आली.

मी म्हणालो, ‘ असे काही नाही. मला ते आंतरधर्मीय विवाहाचे प्रकरण काय आहे ते सांगा बघू.’

सरकारनी काहीशा नाइलाजाने मला सांगितले, ‘ हे बघा, आमच्या गावात एक ठाकूर नावाचा ब्राह्मण आहे. त्याने गावातील एका विधवा मुसलमान स्त्रीशी लग्न केले आहे ! ’

‘ तो गावात आहे का ? ’

‘ होय.’

‘ मी त्याला भेटू शकतो ? ’

‘ होय– होय. तुम्ही आता ज्यांच्या घरी जाणारच आहात, यांच्या शेजारीच तर त्याचे घर आहे ! ’

आम्ही सरकार यांच्या घरावरून गावात जायला निघालो तेव्हा सरकार आपल्या एका रोग्याला तपासण्यासाठी आमच्याबरोबर गावात आले.

मला वाटेत त्यांनी विचारले, ‘ तुम्हाला त्या ठाकूरला कशाकरता भेटायचे आहे ? ’

‘ सहज. एखादा मनुष्य प्रवाहाविरुद्ध वागताना दिसला की मला त्याच्या-विषयी कुतूहल वाटते. प्रेम वाटायला लागते, आणि म्हणून भेटायचेय ! ’

‘ तुम्हाला ठाकूरचे कृत्य न्याय्य वाटते ? ’ त्यांनी विचारले.

मी आश्चर्यचकित होऊन विचारले, ‘ तुम्हाला काय वाटते ? ’

‘ चूक– अजिबात चूक ! ’ ते म्हणाले, ‘ माणसाने धर्माच्या मर्यादा ओलांडू नयेत. ठाकूरने हे चांगले कृत्य केलेले नाही आणि तुम्ही अशा माणसाला भेटू इच्छिता याला काय म्हणावे ? ’

कुंडूंच्या भाचेजावयाच्या घरी आम्ही गेलो. त्याला कुंडूंनी येणार असल्याचे

आधी कळवले होते. ते पाकिस्तानातून आलेले एक हरिजन कुटुंब आहे ! कुंडू हरिजन असल्याचे तोपर्यंत मला माहीत नव्हते. तेव्हाच आश्रमातील त्या बाई ब्राह्मण आहेत हे ते वारंवार मला का सांगत होते याचा उलगडा झाला !

या भाचेजावयाचे चुलते अजून पूर्व पाकिस्तानात राहतात. त्याचे घर नीटनेटके आणि अतिशय स्वच्छ होते. घरात ट्रान्झिस्टर होता. आवारात पपई, आंब्याची झाडे होती. इच्छामती नदीच्या अलीकडल्या काठावर ते होते आणि पलीकडे पूर्व पाकिस्तानच्या जेसोर जिल्ह्याचा प्रदेश होता.

दुपारी आम्ही नदीत जाऊन आंघोळ केली, पाणी पुरुषभर खोल होते. मी जवळ जवळ पलीकडच्या काठापर्यंत जाऊन आलो. मुले नदीत खेळत होती आणि स्त्रिया कपडे धूत होत्या किंवा आंघोळ करीत होत्या. समोर पलीकडच्या काठावरील शेतात कुणी पाकिस्तानी शेतकरी नांगरणी करीत होता. आंतरराष्ट्रीय सीमा आहे, असे मात्र वाटले नाही.

ø

कुंडूंचा जावई मला म्हणाला, " तुम्ही संध्याकाळचे या नदीच्या काठावर उभे राहिलात की दोन्ही देशांची सरकारे अस्तित्वात आहेत का, याविषयी तुमच्या मनात संभ्रम निर्माण होईल. शेकडो माणसे इकडून तिकडे जात असतात आणि तिकडून इकडे येत असतात. '

' आणि सीमारक्षक काय करीत असतात ? '

' अनेकदा दुर्लक्ष करतात, अनेकदा त्यांच्या संगनमतानेच हे घडून येते. अनेकदा प्रयत्न करूनही त्यांची ही ये-जा थांबविता येत नाही !'

या सीमेवर फारशा कधी कटकटी निर्माण होत नाहीत, असेही त्याने सांगितले.

' नदीच्या काठावर नजीक ज्या प्रदेशात गाव असेल, त्या गावातील माणसे समोरच्या नदीचा वापर करतात. जिथे दोन्ही देशांची गावे समोरासमोर वसलेली नाहीत तिथे काय करतात ? '

माझा हा प्रश्न ऐकून ठाकूर हसला. माझा प्रश्न त्याला अजागळपणाचा वाटला, हे माझ्या लक्षात आले. तो म्हणाला, ' येथे चार पावलांवर पाकिस्तानची हद्द असता तेथे कोणी पलीकडचे लोक येऊन गुरे पळवून नेतात तेव्हा असे प्रकार अधूनमधून घडत असतात; परंतु त्यांना फार गंभीर स्वरूप प्राप्त होत नाही ! '

ø

दुपारी जेवण आटोपून ठाकूरकडे गेलो. कारण संध्याकाळपर्यंत मला बगुलला पोचायचे होते व रात्री कलकत्त्याला जायचे होते.

त्याच्याकडे यायलाच आधी कोणी तयार होईना! कुंडूंचा भाचेजावई मला म्हणाला, ' तुम्ही असल्या बदमाष माणसाला कशाला भेटायला जाताय ? तो पाकिस्तानात वर्षभर तुरुंगात होता.'

' कशाकरता त्याला शिक्षा झाली होती ? '

' ते मला नक्की माहीत नाही. चोरीबिरी केली असेल.'

' काही हरकत नाही. मी त्याला भेटणार आहे.' असे मी म्हटल्याने त्याचा नाईलाज झाला. मग त्याने आपल्या वडिलांना आमच्याबरोबर दिले आणि मी, कुंडू आणि ते असे ठाकूरच्या घराच्या दिशेने चालू लागलो.

वाटेत लागलेल्या घरांतील माणसे अतिशय कुतूहलाने आमच्याकडे पाहात आहेत, हे मला जाणवले. काही मुले आणि एक–दोन तरुण तर काही तरी विशेष घडत आहे, या कल्पनेने आमच्या पाठोपाठ येऊ लागली.

ठाकूरच्या घरापासून थोड्याच अंतरावर ते गृहस्थ आणि पाठोपाठ आलेली मुले थांबली. ' ते ठाकूरचे घर. आपण जाऊन या. मी येथे थांबतो.' ते म्हणाले आणि मी व कुंडू पुढे गेलो.

ठाकूर अंगणातच उकिडवा बसला होता. अर्धी चड्डी आणि कुडता असा वेष. गळ्यात जानवे, हातात जळती विडी! त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे झालेले हे पहिले दर्शन उद्दामपणाचे वाटले.

त्याची बायको अंगणातील कूपनलिकेतून पाणी भरीत होती. आम्हांला पाहताच ती आत गेली.

कुंडूंनी आधी स्वतःची माहिती सांगितली. मग माझ्या येण्याचा उद्देश सांगितला. ' हे मुंबईचे पत्रकार आहेत. बंगालमध्ये आलेले आहेत. सीमेवरील माहिती मिळविण्यासाठी येथे आलेले आहेत. अनेकांना भेटत आहेत. तुम्हालाही भेटायला आणले. '

ठाकूर काही म्हणाला नाही. त्याचा चेहरा भावनाशून्यच राहिला. काही क्षण त्याने माझ्याकडे निरखून पाहिले आणि तो पुन्हा विडी ओढू लागला!

' तुम्हाला पाकिस्तानात कशाकरता अटक केली होती ? ' कुंडूंनी त्याला विचारले.

' उगाच. मी हिंदू म्हणून. हिंदूंना त्रास देणे हा त्यांचा गुणधर्मच आहे.' ठाकूर त्वेषाने म्हणाला.

' तुम्ही तिकडे गेलात कसे ? '

' असाच गेलो. माझी थोडी शेतीवाडी आहे. ती पाहायला गेलो.'

' प्रवास-परवाना होता की नाही ? '

'तीर ओलांडायला परवाना मागण्यासाठी आम्ही कलकत्त्याला जायचे आणि त्यासाठी पन्नास रुपये खर्च करावा काय? बरे, परवाना लवकर मिळेल याची खात्री काय? हंगाम संपल्यानंतर मिळून आम्हाला त्याचा उपयोग तरी काय होणार? बरे, मिळाला तरी पाकिस्तान व्हिसा देईल याची खात्री काय? तेव्हा त्या भानगडीत पडायचे काय कारण? संध्याकाळी नदी ओलांडून पलीकडे जायचे. कुठे ओळखीच्या घरी रात्री मुक्काम करायचा, मग पुढे जायचे. एकदा कोणत्याही शहरात गेलो की कोण कुठला याचा थोडाच पत्ता लागतो? पण दुर्दैवाने मला त्यांनी जेसोर शहरात पकडले आणि वर्षभर विनाचौकशी तुरुंगात डांबले. महिन्यापूर्वी सुटका केली आणि हद्दीबाहेर घालवून दिले.'

खरे म्हणजे ठाकूरच्या या कथेत मला फारसे स्वारस्य नव्हते. मला त्याच्या लग्नाविषयी विचारायचे होते. त्याला सरळ काही विचारणेही योग्य नव्हते. त्याची प्रतिक्रिया कोणती होईल याचा अंदाज येत नव्हता.

अखेर लग्नाविषयी सरळ न विचारता मी म्हणालो, 'या अवधीत तुमच्या पत्नी येथे एकट्याच राहिल्या?'

'होय,' ठाकूर म्हणाला. माझ्या या प्रश्नाने तो थोडा खुलून बोलू लागल्याचे माझ्या लक्षात आले.

'तिचे आई-वडील तिला घरी बोलवायला आले होते, परंतु ती गेली नाही.' त्याने अभिमानाने सांगितले. तो हे सांगत असताना त्याची बायको त्याच्या घराच्या दरवाज्यात उभी राहून ऐकत होती.

'तिचे आई-वडील कुठे राहतात?'

'दूरच्या गावी.'

'तुमची तिची ओळख कशी झाली?' मी अखेर विषयाला हात घातला.

ठाकूर रांगडे हसला. म्हणाला, 'ती या गावातच रहात होती. नवरा वारला; माझी ओळख होतीच. आम्ही लग्न करायचे ठरविले.'

'गावातील मुसलमानांनी लग्नाला विरोध केला नाही?'

'केला तर. खूप विरोध केला. दमदाटी दिली. मारहाण करण्याचे प्रयत्न केले. पण मी त्यांना थोडाच बघतोय! त्यांच्या नाकावर टिच्चून लग्न केले!'

'गावातील हिंदूंनी तुम्हाला मदत केली?'

'हिंदूंनी?' ठाकूर अतिशय तुच्छतेने म्हणाला, 'त्यांचे नाव काढू नका. मी काही तरी गुन्हा करीत आहे, अशा समजुतीने सगळे गंमत बघत राहिले!'

'लग्नविधी कसा केलात?'

'कोर्टात रजिस्टर पद्धतीने केले.'

'साक्ष द्यायला कोण आले?'

"अहो पाच रुपये दिल्यावर कोणीही साक्षीला येतो. त्यात विशेष काय?

पैसे मिळाल्यावर दहाजण आले असते ! असेच एकदोन भेटले. त्यांना पाच–पाच रुपये दिले आणि घेऊन गेलो.'

ठाकूर अशा रीतीने गालातल्या गालात हसला की, त्याला सर्वांविषयी वाटत असलेली तुच्छता इतरांना जाणवावी !

' मुसलमान अजून त्रास देतात का ? '

' अधूनमधून कुरापत काढतात. गुरे पळवतात. दुसरा काय त्रास देणार ? पण मी त्यांना सांगून ठेवले आहे, माझ्या वाटेला येऊ नका. तुमची खांडोळी करून टाकीन.' आणि असे म्हणून त्याने जवळचा कोयता उचलून हवेत फिरवला.

ठाकूरला मुले खूप होतीसे दिसले. ती सारी नागडी-उघडी अंगणात खेळत होती. आम्हांला त्याने विड्या ओढायला दिल्या. कुंडूंनी धूम्रपान करीत नसल्याचे सांगून विडी घ्यायचे नाकारले. मी विडी स्वीकारली. त्याने बसल्या जागेवरूनच काड्यांची पेटी माझ्या दिशेने भिरकावली. त्या भिरकावण्यातही एक प्रकारची रांगडी बेपर्वाई होती. बायकोला त्याने आमच्याकरता प्यायचे पाणी आणायला सांगितले. विडी आणि पाणी हा त्याने त्याच्यापरी आमचा केलेला पाहुणचार !

त्याची बायको बाहेर आली. अंगणात ठेवलेल्या एका भांड्यातील पाण्याने तिने ग्लास स्वच्छ धुतले आणि त्यांत पाणी भरून ती तेथेच उभी राहिली. ठाकूरने उठून जाऊन ते ग्लास आमच्यापुढे केले. मग ती आत निघून गेली. तिने आपल्या कपाळावर मला मोठा कुंकवाचा टिळा लावला असल्याचे माझ्या नजरेतून सुटले नाही.

× × ×

. ८ .

# समंजस मुस्लिम स्त्रिया

आसामला जाण्याआधी आणि परतल्यानंतर अशा दोन वेळी मैत्रेयीदेवींनी काही मुस्लिम स्त्री-पुरुषांना चर्चेकरिता बोलावले होते. पहिल्या चर्चेच्या वेळी त्यांनी काही तरुण मंडळींबरोबर रूढ मतवादी लोकांनाही बोलावले. श्रीमती गौरी अयूब, सोशालिस्ट युनिटी सेंटरचे एक तरुण कार्यकर्ते श्री. रडफ, सौ. अझीझी या सामाजिक कार्यकर्त्या, न्यायमूर्ती मसूद, काही मुस्लिम तरुण शिक्षिका, सर्वोदय कार्यकर्ते मलीक आणि युसुफ या नावाचे एक गृहस्थ आणि कलकत्ता विद्यापीठातील कासम नावाचे एक प्राध्यापक अशी मंडळी उपस्थित केली.

या बैठकीचा आरंभच खडाजंगीत झाला ! श्री. युसूफ आणि कासम हे केवळ परंपरावादीच नव्हे तर जमाते इस्लामचे पुरस्कर्ते होते हे त्यांच्या अनौपचारिक बोलण्यातूनच मला दिसून आले ! या मंडळींना मैत्रेयीदेवींनी कशाकरता बोलावले आहे हे मला कळेना. काही क्षणांत त्यांनी जमाते इस्लामची भूमिका मांडायला सुरुवात केली. ‘ छगलांना काढून टाका ’ म्हणजे भारत–पाक संबंध सुधारतील, ही त्यांची भूमिका !

मी त्यांना विचारले, ‘ भारत–पाक संबंध सुधारण्याच्या आड छगला कसे काय येतात ? पाकिस्तानने आजवर भारताशी वैर करण्याचे जे धोरण स्वीकारले त्याला जबाबदार कोण ? छगला यांचे आधी नेहरूच परराष्ट्र खाते सांभाळत होते, तेव्हा का संबंध सुधारले नाहीत ? ’

परंतु या प्रश्नांना कुठलेही तर्कशुद्ध उत्तर या दोन गृहस्थांपाशी नव्हते. आणि समर्पक उत्तर देता येत नाही असे दिसून येताच ते चिडले.

'आपल्या डोक्यात वैचारिक गोंधळ दिसतो आहे!' श्री. कासम मला म्हणाले,

'असला उद्धटपणा ऐकून घ्यावयाची मला सवय नाही!' मी प्रतिटोला हाणला, 'जमाते इस्लामीच्या तत्त्वज्ञानाशी जे सहमत होत नाहीत, व ते विचाराने गोंधळलेले आहेत, असे तुमचे म्हणणे दिसते. गोंधळलेले विचार कशाला म्हणतात, हे तुम्हाला कळते काय?'

ते जमाते इस्लामीचे असल्याबद्दल मी केलेला गौप्यस्फोट त्यांना बोचला हे उघड होते.

त्यांनी या आरोपाचा इन्कारही केला नाही. परंतु प्रत्येक आरोप नाकारायचा आणि प्रतिपक्षावर भरमसाट आरोप करायचा, हे जमाते इस्लामचे तंत्र त्यांनी चांगले अवगत केले होते! 'हिंदूच पुरेसे सेक्युलर नाहीत' असे त्यांचे म्हणणे.

मी त्यांना विचारले, 'मुस्लिम मनोवृत्तीचे काय? भारतातील सगळे लोक जेव्हा एकच धर्म स्वीकारतील तेव्हाच हा संघर्ष संपेल असे 'रेडियन्स' हे जमाते–इस्लामीचे मुख्य पत्र म्हणते याचा अर्थ काय?'

'रेडियन्सने असे लिहिलेले नाही.' श्री. युसूफ यांनी जमाते-इस्लामीचे असत्य बोलण्याचे तंत्र वापरले!

परंतु मैत्रेयीदेवींनी त्यांना मध्येच सांगितले, 'रेडियन्सने असे लिहिले आहे, मला माहीत आहे!'

श्री. युसूफ यांनी यावर देखील 'असे लिहिणे चूक आहे' असे म्हटले नाही!

मी सर्व धर्मियांसाठी समान नागरी कायदा करण्यासंबंधी बोलावे, अशी मैत्रेयीदेवींची इच्छा होती. या विषयावर तुमचे काय म्हणणे आहे? असे म्हणून त्यांनी विषयाला सुरुवात केली.

मी म्हणालो, 'माझे म्हणणे स्पष्ट आहे. आपण एक सेक्युलर घटना बनवली आहे आणि समान नागरी विधेयक करण्याचे तत्त्व या घटनेत मान्य करण्यात आले आहे. मी काही म्हणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तेव्हा असे विधेयक करून आपण सेक्युलॅरिझमचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वाटचाल सुरू करावी एवढेच माझे म्हणणे आहे.'

अर्थात हे म्हणणे युसूफ आणि कासम मान्य यांना होणे शक्यच नव्हते. त्यांनी नेहमीचा युक्तिवाद सुरू केला.

'मुसलमानांच्या कायद्यात काही बदल झालेला नाही.' युसूफ म्हणाले.

'सगळ्या देशात होत आहे.' मैत्रेयीदेवी म्हणाल्या.

'त्या देशात मुस्लिम बहुसंख्य आहेत.'

‘ म्हणजे मुस्लिम जेथे बहुसंख्य आहेत अशा देशात सुधारणा होऊ शकते. इतरत्र होऊ शकत नाही, असे तुम्हांला म्हणायचे आहे काय ? ’

‘ होय. कारण मुस्लिम कायदे बदलण्याचा अधिकार फक्त मुस्लिम स्टेटलाच असतो.’

‘ असे कशावरून म्हणता ? ’ मी विचारले.

‘ ब्रिटिशांनी मॉहमेडन लॉ केला तो कसा ? मॉहमेडन लॉ हीच मुस्लिम शरीयत कायद्यातील एक सुधारणा आहे.’

‘ ब्रिटिशांनी तो बळजबरीने केला.’

‘ म्हणजे बळजबरीने केलेला कायदा तुम्ही मानता.’ मी म्हणालो, ‘ आणि जो बळजबरी करीत नाही त्याला विरोध करता.’

युसूफ भडकले !

‘ आपण मुसमानांवर बळजबरी करावी असे म्हणणार काय ? ’

‘ अर्थातच.’ मी म्हणालो, ‘ कायद्याची सक्ती केल्याखेरीज कोणत्याही समाजात सामाजिक सुधारणा करता आली आहे काय ? हिंदूंवर-देखील ती करावी लागली, मग मुसलमानांवर करावी लागली तर आश्चर्य काय ? ’

‘ असे करणे हे सेक्युलर घटनेत कितपत योग्य ठरेल ? ’ कासम म्हणाले.

‘ असे करणे हेच सेक्युलर घटनेशी सुसंगत ठरेल ! ’ मी म्हणालो.

हे विचार त्यांच्या पचनी पडण्यासारखे नव्हते. थोड्या वेळाने ते निघून गेले. त्यांच्या मागोमाग न्यायमूर्ती मसूदही चालायला लागले.

आमची ही चर्चा चालू असताना मसूद यांनी अवाक्षर देखील तोंडातून काढले नाही. मैत्रेयीदेवींना हे खटकल्याखेरीज राहिले नाही.

मागाहून जी मंडळी उरली त्यांनी समान कायद्याला अनुकूलता दर्शविली. ‘ समान कायदा ताबडतोब होत नसेल, तर मुस्लिम कायद्यात आवश्यक त्या सुधारणा तरी घडून याव्यात, या बाबतीत प्रयत्न करावयाची आंदोलने उभारण्याची आमची तयारी आहे ’ असे सौ. अझीझी व श्री. युसूफ यांनी सांगितले.

मी आसामहून परतल्यानंतर पुन्हा एकदा भेटावे असे त्या दिवशी ठरले.

ही चर्चा संपल्यानंतर मी काही वेळ मैत्रेयीदेवींकडे थांबलो होतो. झालेल्या चर्चेने त्यांचाही विरस झाला होता, हे दिसून आले. विशेषतः न्या. मसूदनी देखील

कासम आणि युसूफ यांच्या परंपरागत विचारांना जरा देखील विरोध दर्शविला नाही याचे त्यांना दुःख झाले !

मी त्यांना म्हणालो, ' ही तुमची चूक आहे. खरे म्हणजे मला तुमचा राग आला आहे. तुम्ही या चर्चेला जमाते इस्लामीवाल्यांना बोलावलेत कसे, हे मला कळलेले नाही. मी प्रथम तुम्हाला भेटलो तेव्हा मी एक हिंदू आहे, असे समजून राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जातो की नाही याची चौकशी केलीत, मी हिंदू असतो आणि संघात जात असतो तर तुम्ही माझ्याशी या प्रश्नाबाबत सहकार्य केले नसते, हे उघड आहे. तुम्ही जातीय वादाविरुद्ध असाल तर मग सर्व जातीय वादाचे विरुद्ध असला पाहिजेत, या न्यायाने तुम्ही जमाते इस्लामीयांना देखील बोलावता कामा नये.'

त्या म्हणाल्या, ' मी त्यांना मुद्दामच बोलावले. कायद्यात बदल करावा असे एकदा मी लिहिले होते, तेव्हा हे लोक माझ्यावर तुटून पडले होते; परंतु तुमच्यासारखा कोणी तरी बदल करावयाच्या भूमिकेला पाठिंबा देतो आहे, हे त्यांना कळावे म्हणून मी खटाटोप केला ! '

मी आसामहून परतल्यावर घेतलेल्या बैठकीच्या वेळी त्यांनी ही चूक केली नाही. या लोकांना वगळले आणि सामाजिक कायद्याला बदलाला अनुकूलता दर्शवतील अशा मंडळींना बोलावले. या वेळी १५–२० मुस्लिम स्त्रिया आल्या होत्या. त्यांतील २–४ स्त्रियांना त्यांच्या नवऱ्यांनी टाकले होते ! त्यांना पोटगी दिली गेली होती, त्यांतील दोघींना मुले होती.

मला या सभेला जायला उशीर झाला. उशीर झाल्याबद्दल मी त्या महिलांची क्षमा त्या दिवशी मागितली. त्यांतील एक बाई माझ्याकडे रोखून पाहात म्हणाल्या, ' तुमच्याने हे काम झेपणार नाही. तुम्ही हे काय आरंभले आहे याची तुम्हाला कल्पना आहे काय ? '

' पूर्ण कल्पना आहे ' मी त्यांना सांगितले. ' स्त्री–पुरुषांच्या बाबतीतील कायदा समानतेवर आधारित असला पाहिजे, असा माझा आग्रह आहे. तसा तो व्हावा म्हणून मी प्रयत्न करणार आहे.'

' अहो, तुम्ही येथे वेळेवर देखील येऊ शकला नाही, मग एवढी मोठी जोखीम कशी काय पार पाडणार ? '

या बाई अतिशय आक्रमक पवित्र्यात बोलत होत्या !

' उशीर झाल्याबद्दल मी तुमची आधीच क्षमा मागितली आहे; आणि या कामाबद्दल म्हणाल तर आपण स्त्रिया हे परिवर्तन घडवून आणणार आहोत. आपण सनातनी मंडळीविरुद्ध बंड करण्याचे धैर्य दाखवण्यावर सारे अवलंबून आहे. माझी भूमिका या बंडासाठी तुम्हाला प्रवृत्त करण्याची आहे, मदत करण्याची आहे. आपण मला येथून काय मदत कराल ते सांगा.'

'आपण काय करायचे ठरवले आहे ?'

'माझ्या मनात भारतातील मुस्लिम महिलांच्या हजारो सह्यांचा अर्ज राष्ट्रपती, लोकसभा आणि पंतप्रधान यांना सादर करावयाचा आहे. आपण मला येथून सह्या मिळवून द्या.'

त्या बाईंनी क्षणभर विचार केला. मग त्या म्हणाल्या, 'ठीक आहे. आम्ही सह्या मिळवून देऊ.'

'तेवढ्यावरच भागणार नाही' मी म्हणालो, 'तुमच्यापैकी कुणाला तरी अर्ज सादर करायला दिल्लीला आले पाहिजे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांतील ८–१० मुस्लिम महिलांच्या शिष्टमंडळाने जाऊन ही मागणी केली पाहिजे, अशी माझी इच्छा आहे.'

'आम्ही येऊ.' त्या म्हणाल्या.

आमची ही सभा संपेपर्यंत या बाई बऱ्याच शांत बनल्या. त्यांचा प्रारंभीचा आक्रमक पवित्रा राहिला नाही. निघताना त्या मला म्हणाल्या, 'तुम्ही एकदा माझ्या पतींना भेटा. तसे ते तुमच्या या चळवळींना पाठिंबा देणार नाहीत, पण स्वभावाने अतिशय चांगले आहेत.'

मी त्यांना हसून म्हणालो, 'तुमच्याशी चांगले वागण्याखेरीज त्यांच्यापुढे काही गत्यंतरच नसेल. कारण तुमच्या या आक्रमक स्वभावापुढे त्यांचा थोडाच निभाव लागणार आहे ? इतर मुस्लिम स्त्रियांना पुरुषांपासून संरक्षण हवे आहे, परंतु तुमच्या बाबतीत त्याची आवश्यकता आहेसे दिसत नाही !'

'का बरे ?'

'उघडच आहे !' मी म्हणालो, 'त्यांनाच तुमच्या संरक्षणाची आवश्यकता असणार !'

बाईंना उपजतच विनोदबुद्धी असावी. त्या हसून म्हणाल्या, 'पाहिलेत ! तुम्ही पुरुष पडलात. लगेच एका पुरुषाची बाजू घेतलीत ! म्हणून म्हणते आहे, तुमच्याने हे कार्य झेपणार नाही ! साऱ्या मुस्लिम पुरुषांना विरोध करता येणार नाही !'

× × ×

. ९ .

# हमदी बे यांचे विचित्र विचार

गौहत्तीला समाजवादी मित्र भेटले. वीरेंद्र भट्टाचार्य, हरेन, बेझ बारुआ यांनी भारतातील हिंदू-मुस्लिम समस्येचा सखोल विचार केला असावा असे त्यांच्या बोलण्यावरून वाटले. त्यांतील भट्टाचार्य हे बंगाली बुद्धिजीवी वर्गाप्रमाणे बरेचसे स्वप्नाळू वृत्तीने भारलेले दिसले, पण बेझ बारुआ अधिक व्यवहारवादी होते. अल्पसंख्याक गटाचे नेते त्या त्या जमातीच्या मागासलेपणाचा गैरफायदा घेतात, हा मुद्दा त्यांनी बोलताना पुनः पुन्हा मांडला. आसामच्या डोंगरी प्रदेशातील जनतेचे नेतृत्व करणारे निकोलस रॉय यांच्यासारखे नेते आणि मोइनुल हक चौधरी हे बिगरआसामी मुस्लिम नेते, हे केवळ आपल्या जनतेच्या हक्कांची भाषा बोलूनच आपले नेतृत्व टिकवीत आहेत असे त्यांनी प्रतिपादन केले.

त्यांच्या या प्रतिपादनाशी कुणाचा मतभेद असण्याचे कारण नाही, परंतु हे नेतृत्व सतत आपल्या समाजाला चुकीच्या मार्गाने नेते आणि म्हणून प्रश्न उपस्थित होतात, असे मानण्याएवढे श्री. बेझ बारुआ भोळसट नाहीत, ही मला समाधानाची गोष्ट वाटली.

चष्मा काढून तो आपल्या शर्टने पुसत ते गंभीरपणे मला म्हणाले, ' प्रत्येक समाजाच्या काही अंतःप्रेरणा असतात. त्या प्रेरणांना खतपाणी देणारे नेतृत्व तो समाज निर्माण करीत असतो. या प्रेरणांचे स्वरूप बदलणे हाच यावरील खरा उपाय आहे.'

बेझ बारुआंनी जेव्हा हे म्हटले तेव्हा हे परिवर्तन कसे घडवून आणता येईल, याविषयीही त्यांच्या मनात संदेह नव्हता. केवळ तर्कशुद्ध विवेकी आंदोलनांमुळेच सामान्य जनांत हे परिवर्तन घडवून आणता येईल असे त्यांना वाटते. शिक्षणाचा अधिक प्रसार हा एक मार्ग ठरू शकेल, असे त्यांनी बोलून दाखवले.

वीरेन्द्र भट्टाचार्यांनी माझी त्यांच्या काही मुस्लिम मित्रांबरोबर ओळख करून दिली. त्यांतील एक इंजिनिअर होते. ते जमायते उलेमाचे पाठिराखे होते! त्यांच्याकडे जमायते उलेमाचे आसाममधील नेते मौलाना फुरकान यांची भेट झाली. मौ. फुरकान आसाममधील बेकायदा पाकिस्तान्यांना घालविण्यासाठी चाललेल्या प्रयत्नांत आसामी मुसलमानांवर हाकलले जाण्याचा प्रसंग ओढवू नये म्हणून प्रयत्नशील आहेत! अर्थात आसामी मुसलमानांची त्यांची व्याख्या सर्व बेकायदेशीर घुसखोर हे आसामीच आहेत हीच होती!! परंतु भारत सरकारला त्यांनी या प्रकरणी दोष दिला नाही. आसामी सरकारलाही फारसा दोष देण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत. या प्रश्नाचे गांभीर्य ते ओळखून आहेत असे मला त्यांच्या बोलण्यावरून वाटले.

घुसखोरांच्या या प्रश्नाने आसाममधील प्रत्येक नागरिक अस्वस्थ झालेला आहे; हे आसाममध्ये पाऊल टाकताक्षणीच जाणवते. 'नूतन आसामिया' या आसामी भाषेतून निघणाऱ्या दैनिकाचे संपादक श्री. हरेन बारुआ यांनी तर आसाममध्ये किमान पाच लाख पाकिस्तानी घुसले आहेत, असे मला सांगितले!

'या प्रश्नावर आसाम कॉंग्रेसच्या मुस्लिम नेत्यांची भूमिका काय आहे?' असे मी त्यांना विचारले असता ते उसळून म्हणाले, 'त्यांची काय भूमिका असणार? आपल्याला पाठिंबा देणाऱ्या जमातींची संख्या वाढत असल्यास ते कोणाला नको असेल?'

'यामागे आसामला पुढेमागे पाकिस्तानात सामाविष्ट करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे, असे आपल्याला वाटते काय?' मी त्यांना विचारले.

'पाकिस्तानच्या बाबतीत म्हणायचे तर असे प्रयत्न ते करीत नसतील असे मानण्याचे काहीच कारण नाही. येथील मुस्लिम नेत्यांविषयी बोलायचे तर हा विभाग पाकिस्तानात जाणार असे वाटत असेल असे मला वाटत नाही, परंतु त्यांना मुसलमानांची संख्या वाढवून आमच्याशी सौदा करता आला

तर हवाच आहे. पण जेव्हा मुसलमानांची संख्या अधिक वाढेल तेव्हा त्यांचे हे नेते राहणार नाहीत. मुसलमान तेव्हा पाकिस्तानी आदेश मानायला लागतील ! सध्याच्या काँग्रेसमधील किंवा अन्य पक्षांतील मुस्लिम नेतृत्वाला मुसलमान झुगारून देईल. ही अगदी काळ्या दगडावरली रेघ आहे ! ' असे त्यांनी सांगितले.

आसामधील या बेकायदा घुसलेल्या पाकिस्तान्यांच्या प्रश्नाविषयी दोन प्रकारची परस्परविरोधी टोकाची मते आढळून आली. एक दोन अपवाद वगळल्यास सर्वच पक्षांतील मुसलमान आमदार आणि कार्यकर्ते यांच्या मते पाकिस्तानातून कोणी बेकायदा आलेलेच नाहीत ! ' येथील मुसलमानांची ते पाकिस्तानी असल्याच्या आरोपावरून हकालपट्टी चाललेली आहे, ' असे ते म्हणतात, तर ' आसाममधील बहुतेक मुसलमान हे बेकायदा येथे आलेले आहेत, ' हे दुसऱ्या टोकाचे मत ! या दोन्ही परस्परविरोधी मतांतून सत्य हुडकून काढणे अर्थात फारसे अवघड नाही. आणि ते हे की, निदान तीन-चार लाख पाकिस्तानी आसाममध्ये घुसलेले आहेत. सुमारे दीड लाख पाकिस्तान्यांना परत पाठविण्यात आलेले आहे आणि इतरांविरुद्ध कारवाई चालू आहे !

' स्टेट्‌समन ' या दैनिकाचे आसाममधील विशेष प्रतिनिधी श्री. हमदी बे यांची भेट हा प्रश्न समजून घेण्याच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरली. हमदी बे पूर्वीचे रॉयिस्ट. गेली अनेक वर्षे आसाममध्येच राहतात. बेकायदा घुसलेल्या पाकिस्तान्यांची माहिती त्यांनीच १९६९ च्या जनगणनेच्या वृत्तांताचा अभ्यास करून ' स्टेसमन 'मध्ये प्रथम उजेडात आणली. त्यांनी पुरविलेली माहिती बरीचशी निःपक्षपाती आणि बरोबर होती आणि निदान दोन ते तीन लाख पाकिस्तानी आले असावेत, हा त्यांचाही अंदाज आहे.

हे सारे बोलताना कुठे तरी हमदी बे यांची तटस्थता ढळली आणि भारत-पाकिस्तान युद्धाकडे ते वळले. ' हे युद्ध शास्त्रींनी निष्कारण ओढवून घेतले ' असे म्हणून शास्त्रींवर त्यांनी हल्ला चढवला ! बोलता बोलता उठून चहा

आणायला ते आत गेले. मी भट्टाचार्यांना म्हटले, ‘ तुमच्या मित्राचे बोलणे मघापासून मी शांतपणे ऐकून घेतले. त्यांचे सर्व प्रतिपादन मान्य नसले तरी ऐकून घेतले – कारण हा प्रश्न मला समजून घ्यायचा आहे, परंतु श्री. बे यांच्याशी दोन हात केल्याखेरीज आता गत्यंतर नाही असे मला वाटू लागले आहे. कारण त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत कुठे तरी चूक आहे असे मला वाटते.’

श्री. बे चहा घेऊन आले तेव्हा भट्टाचार्य त्यांना म्हणाले, ‘ माझ्या मित्रांना तुमच्याशी दोन हात करावयाचे आहेत ! ’

‘ कशाकरता ? ’ बे नी विचारले.

मी म्हणालो, ‘ दोन हात करायचे आहेत, असे जे मी म्हणालो, त्याच्याकडे फारसे लक्ष देऊ नका. तथापि आता आपण जे काही म्हणालात त्याविषयी मला काही शंका आहेत.’

‘ विचारा. ’

‘ मला एवढेच आपणाकडून समजून घ्यायचे आहे की, पाकिस्तानने काश्मीरमध्ये सशस्त्र हल्लेखोर पाठवल्यानंतर युद्ध करण्याखेरीज या सरकारपुढे दुसरा काय मार्ग होता असे तुम्हास वाटते ? ’

‘ युद्ध हाच काही मार्ग नसतो.’ ते म्हणाले, ‘ युद्धाने काय फायदा झाला ? अर्थव्यवस्था खिळखिळी झाली ! ’

‘ मला मान्य आहे, परंतु त्या वेळी पर्याय काय होता ते मला तुम्ही सांगा.’

‘ काही करावयाचे नाही ! ’

‘ म्हणजे काश्मीरमध्ये पाकिस्तान्यांना धुमाकूळ घालायला परवानगी द्यायची ? ’

‘ असे नाही. त्यांना पकडून बाहेर पाठवून द्यायचे ! ’

‘ आणि पाकिस्तानने पुन्हा ते पाठवीत राहायचे ? याचा अंत काय झाला असता, हे आपण सांगू शकाल काय ? ’

श्री. बे काही क्षण स्तब्ध बसले. मग म्हणाले, ‘ परंतु यातून देशाचे नुकसान झालेच ! ’

‘ म्हणजे तुमचे म्हणणे असे की, दुसऱ्या राष्ट्राने आक्रमण केले तर हटवायला त्रास होत असेल तर आपण ते हटवू नये. कारण आक्रमण परतवताना थोडे आपलेही नुकसान होईल ! आपले नुकसान करून न घेण्याचा एकमेव मार्ग आक्रमक जे मागेल ते ते देणे हाच एक आहे ! उद्या तुमच्या बेडरूममध्ये कोणी धटिंगण शिरला तर त्याला घालवताना तुम्हाला लागेल, खरचटेल म्हणून तुम्ही बेडरूम सोडून मुकाट्याने स्वयंपाकघरात जाल असे दिसते ! ’

मी हे एवढ्या तीव्रतेने बोलायला नको होते असे मागाहून मला वाटले.

विशेषत: शेवटचे वाक्य उच्चारायला नको होते ! भट्टाचार्य थोडेसे अस्वस्थ झाले. श्री. हमदी बे निरुत्तर होऊन काही काळ तसेच बसून राहिले. अखेर सावरून घेण्याच्या हेतूने मी म्हणालो, ‘ प्रत्येक देशाच्या स्वातंत्र्याची, स्वाभिमानाची म्हणून काही बाब असते. ती नफा–नुकसानीच्या परिभाषेत मोजता येत नाही. माझा एवढा मुद्दा आपण लक्षात घ्यावा एवढेच माझे म्हणणे आहे.’

श्री. हमदी बे अर्थात चिडले नाहीत. त्यांच्या रॉयवादी विचारसरणीने त्यांना माझ्या दृष्टिकोणाकडेही थंडपणे पाहण्याचे शिकविले असावे. आम्हाला बाहेर पोचवायला आले तेव्हा त्यांनी ‘ तांबूल ’ आग्रहाने घ्यायला लावला आणि पुन्हा भेटायला यावयास सांगितले !

× × ×

. १० .

# मानसिक तणाव

वीरेन्द्र भट्टाचार्यांनी ज्या काही मुस्लिम कुटुंबांशी माझा परिचय करून दिला त्यांत मौ. तय्यबुल्लांच्या कुटुंबियांचा खास उल्लेख करणे आवश्यक आहे.

तय्यबुल्ला दोन वर्षांपूर्वी निधन पावले. फाळणीच्या काळात ते आसाम प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांच्या पत्नी, मुली, सुना आणि मुलगे अशा सर्व परिवाराशी माझा परिचय झाला. मुसलमान कुटुंबात परक्या माणसासमोर अगदी मोकळेपणाने सारी एकत्र येऊन गप्पा मारण्याचा, मी हा पहिलाच अनुभव घेतला ! या कुटुंबातील स्त्रिया बुरखा तर पाळीत नव्हत्याच, परंतु परक्या माणसासमोर न जाण्याच्या खानदानी कल्पनाही या कुटुंबांत रूढ झाल्या नव्हत्या.

ø

आसाममध्ये किंवा इतरत्र, जातीय भावनांचा सर्वस्वी त्याग केलेल्या ज्या काही मोजक्या मुस्लिम व्यक्ती मला आढळल्या त्यांत तय्यबुल्ला कुटुंबियांचा समावेश करावा लागेल. तय्यबुल्ला यांचे चिरंजीव एका स्थानिक कॉलेजात प्राध्यापक आहेत. मला त्यांनी तय्यबुल्लांनी लिहिलेली दोन पुस्तके भेट दिली. त्यांतील एक ' इस्लाम 'वर लिहिलेले असून ते इंग्रजीत होते. दुसरे त्यांच्या राजकीय जीवनावरील आत्मचरित्रवजा पण असामी भाषेतील होते. मला असामी भाषा कळत नाही. परंतु तय्यबुल्ला यांच्या चिरंजीवांनी दाखवलेल्या प्रेमाने मी भारावून गेलो.

ø

गौहत्तीमधील एक समाजवादी वकील श्री. पटवारी यांनी काही मुस्लिम व्यक्तींबरोबर, त्यांच्याशी चर्चा व्हावी या हेतूने, ओळख करून दिली. तेव्हा मात्र अगदी उलट अनुभव आला ! माझी ओळख करून दिल्यानंतर पटवारी दुसऱ्या एका गृहस्थांशी बोलू लागले, तेव्हा मला ते गृहस्थ म्हणाले, ' आपण चर्चा करायला याल तेव्हा एकटे या ! '

' का बरे ? '

' आम्हाला असे कळले की, तुम्ही नेहमी तुमच्या हिंदू मित्रांना बरोबर आणीत असता. त्यांच्यासमोर आम्हाला मनमोकळे बोलता येणार नाही.'

' का बोलता येणार नाही ? आपल्याला काही गुप्त चर्चा करावयाची नाही, किंवा कसला कट करावयाचा नाही. हिंदूंच्यासमोर बोलायला तुम्हाला का अडचण वाटावी ?

माझ्या प्रश्नाचे त्यांनी सरळ उत्तर दिले नाही. ते म्हणाले, ' मुसलमान मनमोकळे बोलत नाहीत ! '

' तसे असेल तर माझा नाईलाज आहे.' मी सांगितले, ' माझ्याबरोबर माझे हिंदू मित्र असतील. कारण तुमचे कोणतेही प्रश्न तुमचे एकट्याचे नसून ते या देशात बहुसंख्य असलेल्या जनतेचेही आहेत. त्यांची सोडवणूक व्हायला हवी असेल तर ते त्या बहुसंख्य जनतेच्या सदिच्छेनेच सुटू शकतील असे मी मानतो. आपण काय मानता याची मला कल्पना नाही, परंतु आपल्या प्रश्नांची आपण सर्वांच्या समक्ष चर्चा करणे अधिक उचित ठरेल ! '

ते काही बोलले नाहीत. त्यांनी मला नंतर चर्चेकरता बोलावले नाही ! परंतु ' आपण कोणती वर्तमानपत्रे वाचता ?' असे मी सहज विचारले असताना त्यांनी जमाते-इस्लामीच्या नियतकालिकांची भराभर नावे सांगितली ! त्यावरून फक्त मुसलमानांची चर्चा ठेवण्याचा त्यांचा हेतू कोणता असावा हे स्पष्ट होते.

आसाममधील मुसलमानांत आसामी मुसलमान आणि स्थलांतरित बंगाली मुसलमान असे असलेले भेदही मला या निमित्ताने दिसून आले. आसाममधील मुसलमानांची एकूण संख्या जवळजवळ चोवीस लाख आहे. त्यांपैकी फक्त आठ लाख मूळचे आसाममधील असून बाकीचे सोळा लाख पूर्व बंगालमधून आलेले स्थलांतरित आहेत ! आसामी मुसलमान हा या स्थलांतरितापेक्षा वर्णाने उजळ, चालीरीतीने वेगळा आणि किंचित अधिक प्रगत वाटतो. त्यांची नावे देखील आसामी हिंदूंप्रमाणे बारुआ, बेझ बारुआ अशी आहेत. त्यांच्या स्त्रिया पडदा न पाळणाऱ्या आणि अधिक मोकळ्या वागणाऱ्या आढळतात. मोगलांनी

आसामवर जे अनेकदा हल्ले केले त्यावेळी मोगलांच्या पकडल्या गेलेल्या सैन्यांतील कैद्यांचे हे वंशज ! अहीम राजांनी मोगलांचा आसाममध्ये शिरकाव होऊ दिला नाही आणि या कैद्यांना आसामच्या अंतर्भागात पाठविले. ते तेथेच स्थायिक झाले. मूळातील अहीम आणि इतर जातींच्या लोकांशी त्यांचा वर्ण-संकर झाला. आसामच्या जीवनात ते जवळजवळ समरस झाले.

काही स्थलांतरित देखील गेल्या शंभर वर्षांत आलेले आहेत. आसाममध्ये बाहेरून लोक येऊन राहू लागले. तेव्हा बंगालच्या लोकांचे त्यांतील प्रमाण सर्वात जास्त असणे स्वाभाविक होते. बंगालचे हिंदू आणि मुसलमान दोघांचेही लोंढे आसामकडे वाहू लागले. आलेले मुसलमान शेतकरी होते, तर हिंदू मध्यम वर्गीय होते. गंमत अशी की येथे आलेल्या मुसलमानांनी आपली बंगालची प्रथा सोडून आसामी आत्मसात केली. बंगाली हिंदू मात्र बंगालीलाच चिकटून राहिले ! अशा रीतीने स्थलांतरित बंगाली हिंदू-मुसलमानांत मानसिक विभागणी झाली, परंतु आसामी मुसलमान आणि स्थलांतरित बंगाली मुसलमान यांच्यांत संपूर्ण मानसिक ऐक्य प्रस्थापित होऊ शकले नाही. हे मानसिक ऐक्य हिंदू-विरोधी भावनेच्या रूपाने मात्र अस्तित्वात आहे. आसाममध्ये बंगाली मुसल-मानांचे स्थलांतर घडवून आणण्याचे कार्य सादुल्ला हे आसामी मुसलमान गृहस्थ आसामचेच मुख्यमंत्री असताना त्यांनी मोठ्या प्रमाणावर केले ! थोडक्यात संख्याबळ वाढवण्याबाबतीत बंगाली मुसलमानांवर अवलंबून राहावयाचे तंत्र आसामी मुसलमान अवलंबत होते. अजूनही अवलंबत असावेत.

ø

मात्र नोकऱ्या आणि इतर महत्त्वाच्या जागांवर बंगाली स्थलांतरित मुसल-मानांचे प्रमाण फारच आढळते. आसामच्या राजकारणात फक्रुद्दिन अली अहमद हे आणि मोइनुल हक चौधरी हे स्थलांतरित बंगाली, आणि दोघेही आपापल्या जनतेचे प्रतिनिधित्व करीत असल्याचा दावा करू शकतात. तसा मोइनुल हक चौधरी करू शकत असतील किंवा काय याविषयी शंका वाटते.

गोहत्तीच्या बार कौन्सिलमध्ये एकदा बसलो असताना एक मुसलमान वकील मला म्हणाले, ' आपण शिलाँगला जाल तेव्हा उच्चपदस्थांना एक प्रश्न विचारा.'

' कोणता ? '

' सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांचे प्रमाण किती आहे ? '

' विचारीन ! '

' परंतु तेवढ्यावरच थांबू नका. तुम्हाला आकडे पुरवण्यात येतील आणि

मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात येते असे सिद्ध करण्यात येईल.'

'म्हणजे हे सारे खोटे असेल असे तुम्हाला म्हणावयाचे आहे का?'

'नाही, खोटे नसेल; प्रश्न असा आहे की, हे प्रतिनिधित्व कुणाला देण्यात आलेले आहे? आसामी मुसलमानांना? आसामी मुसलमान एक-तृतीयांश आहेत. आम्ही स्थलांतरित मुसलमान दोन-तृतीयांश आहोत; परंतु आमच्यापैकी फारच थोडे सरकारी नोकऱ्यांत घेण्यात आले आहेत! तुम्ही हे विचारा की स्थलांतरित मुसलमानांत बंगाल्यांचे प्रमाण काय आहे? ते जवळजवळ शून्य असल्याचे तुम्हाला आढळून येईल! आमच्या जिवावर या आसामयांची चंगळ चालली आहे.'

आसाममधील आसामी आणि बिगर आसामी मुसलमानांतील मानसिक तणावाचे त्या गृहस्थांच्या या उद्‌गारांतून मला असे दर्शन झाले!

× × ×

REFBK-0023533

Scan
27-02-19